CMYK

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १२ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३३२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था 'युएई' आणि सिंगापूरपेक्षा मोठी होणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. ११ मार्च :** महाराष्ट्राचा जीडीपी २०१३ - १४ मध्ये १६ लाख कोटी होता. पुढील दहा वर्षांत आम्ही तो ५१ लाख कोटींवर नेला. आमच्या काळात राज्याची अर्थव्यवस्था तीपटीहून अधिक वाढली. ही गती पाहता, येत्या दोन-तीन वर्षांत महाराष्ट्र सिंगापूर आणि युएईसारख्या बलाढ्य अर्थव्यवस्थांनाही मागे टाकेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधानसभेत व्यक्त केला.

अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. विरोधकांनी उपस्थित केलेले विविध मुद्दे खोडून काढत त्यांनी राज्याच्या 'ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्थेचा रोडमॅप सभागृहासमोर मांडला. विरोधकांच्या टीकेला सांख्यिकीय पुराव्यांनी उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था विस्तारत आहे. महाराष्ट्र हे वेगळे राष्ट्र असते, तर आपली अर्थव्यवस्था जगात ३०वी असती. पहिल्या ३५ देशांचा विचार केला तर महाराष्ट्राने ऑस्ट्रिया, थायलंड, नॉर्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि बांगलादेश या देशांनाही मागे टाकत मोठी अर्थव्यवस्था उभी केली आहे. पुढील २-३ वर्षांत युएई आणि सिंगापूर यांच्या अर्थव्यवस्थेलाही मागे टाकू. अर्थसंकल्पात छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केलेला नाही, अशी टीका आमदार जयंत पाटील यांनी केली होती. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, हे सरकार छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांना कधी विसरू शकत नाही. कारण, ते होते म्हणून आम्ही आहोत, असेही त्यांनी सांगितले.

निधी वाटपात भाजपला झुकते माप मिळाल्याच्या आरोप जयंत पाटील यांनी केला. अर्थसंकल्पातील विभागनिहाय तरतुदी पाहता, ५९ टक्के निधी भाजप, २२ टक्के शिवसेना आणि राष्ट्रवादीकडील खात्यांना केवळ १९ टक्के निधी मिळाल्याची टीका पाटील यांनी केली. त्याचा समाचार घेताना मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडीच्या काळातील आकडेवारीच मांडली. ते म्हणाले, मविआ सरकारच्या काळात मुख्यमंत्री पद असलेल्या शिवसेनेला (एकत्रित) केवळ १६ टक्के निधी मिळाला होता, तर राष्ट्रवादीने ५७ टक्के स्वतःकडे ठेवला. काँग्रेसला २६ टक्के निधी देण्यात आला. त्यामुळे निधी हा खातेनिहाय मिळतो, पक्षनिहाय नाही, याची आठवण मुख्यमंत्र्यांनी करून दिली.

मुख्यमंत्री म्हणाले, २०१३-१४ मध्ये राज्याचा एकूण जीडीपी १६ लाख कोटी रुपये होता, तो गेल्या १० वर्षांत ५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. म्हणजेच



राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तीनपट विस्तार आमच्या कार्यकाळात झाला. राज्याची अर्थव्यवस्था सध्या ७.९ टक्के दराने वाढत असून दरडोई उत्पन्न ३ लाख १७ हजार रुपयांवरून ३ लाख ४७ हजार रुपयांपर्यंत वाढले आहे. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात पाचव्या क्रमांकावर असला, तरी लोकसंख्या आणि जीएसडीपीचा विचार केला तर राज्य अव्वल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १४.३ टक्के आहे. परकीय गुंतवणूक (एफडीआय) आणि तेलविरहित निर्यातीत राज्य पहिल्या क्रमांकावर आहे, तर सॉफ्टवेअर विकासात दुसऱ्या क्रमांकावर आहे. स्टार्टअप्स आणि वृक्षआच्छादनातही महाराष्ट्र आघाडीवर मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

राज्यावरील कर्ज ९.३२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढल्याचा विरोधकांचा आरोप फेटाळताना फडणवीस म्हणाले की, उत्पन्नातील वाढ जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली जात आहे. राज्याचे कर्ज-उत्पन्न गुणोत्तर सध्या १८.२ टक्के असून पुढील वर्षी ते २० टक्क्यांपर्यंत जाईल असे अनेकांनी सभागृहात सांगितले. परंतु, ती मर्यादा ओलांडली जाणार नाही, याची खबरदारी सरकार घेत आहे.

# एसटी प्रवाशांसाठी आनंदाची बातमी!
## महामंडळात १७,७४२ पदांची होणार जंगी भरती

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. ११ मार्च :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (एसटी) चेहरामोहरा बदलण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. विधान परिषदेत आ. श्रीकांत भारतीय यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी उचलल्या जाणाऱ्या पावलांची सविस्तर माहिती दिली. महामंडळात लवकरच १७,७४२ चालक आणि वाहकांची मेगाभरती केली जाणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

आमदार श्रीकांत भारतीय यांनी कंत्राटी भरती आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक म्हणाले की, २०२२ मधील एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रवाशांचे हाल होऊ नयेत, म्हणून तातडीचा उपाय म्हणून कंत्राटी चालकांची नियुक्ती करण्यात आली होती. ही एक अपरिहार्य आणि तात्पुरती व्यवस्था होती. सध्या एसटीच्या ताफ्यात १४,००० बसेस असून प्रवाशांची वाढती संख्या लक्षात



घेता, कर्मचाऱ्यांची ही कमतरता भरून काढण्यासाठी कायमस्वरूपी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. भरतीचा असा आहे आराखडा महामंडळाने राज्य सरकारच्या वित्त विभागाकडे भरतीचा सविस्तर प्रस्ताव पाठवला आहे. यामध्ये... १२,३८१ पदे: नवीन चालक आणि वाहकांसाठी. ५,३६१ पदे: पुढील ४ वर्षांत निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची जागा भरण्यासाठी. एकूण : १७,७४२ कर्मचाऱ्यांची मेगाभरती करण्यात येणार आहे. या भरतीमुळे महामंडळाची स्वतःची हक्काची यंत्रणा अधिक मजबूत होईल आणि कंत्राटी पद्धतीवरील अवलंबित्व कमी होईल, असा विश्र्वास सरकारने व्यक्त केला आहे. महायुती सरकारने एसटीसाठी दरवर्षी ५,००० नवीन बसेस घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापैकी ८,००० बसेसची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून ३,००० बसेस प्रत्यक्ष रस्त्यावर धावू लागल्या आहेत. महिलांसाठी ५०% सवलत आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास यांसारख्या लोककल्याणकारी योजनांमुळे जरी महामंडळावर आर्थिक भार येत असला, तरी 'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून सरकार सर्वसामान्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवास देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले. आमदार श्रीकांत भारतीय यांनी कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि कामाच्या दर्जाबाबत व्यक्त केलेल्या चिंतेची दखल घेत, मंत्र्यांनी सांगितले की, या मेगाभरतीमुळे एसटीचा दर्जा अधिक सुधारेल. तसेच या विषयावर अधिक सखोल चर्चा करण्यासाठी लोकप्रतिनिधींसोबत स्वतंत्र बैठक घेण्याची तयारीही त्यांनी दर्शवली.

# अमेरिकेकडे सर्वाधिक राखीव तेलाचा साठा; भारताकडे २५० कोटी लिटरचा बफर




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** होर्मुझच्या सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे आता जगभरातील देशांना धोरणात्मक तेल साठ्यांचे महत्त्व लक्षात आलं आहे. मध्य पूर्वेत इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका यांच्यात सुरु असलेल्या युद्धामुळे भारतातही तेलाच्या कमतरतेच्या भितीने धाबे दणाणले आहेत. अमेरिकेकडे जगातील सर्वात मोठा धोरणात्मक साठा आहे, तर चीनही मागे नाही. पण, भारताकडे किती हजार कोटी लीटर तेलाचा राखीव साठा आहे? प्रत्येक देशाकडे किती मोठा तेलाचा साठा किती मोठा आहे आणि तेलाच्या संकटात कोण, किती दिवस टिकू शकतं आपण पाहूया.

पश्र्चिम आशियात संघात कमी व्हायचं नाव घेत नाहीये. यामुळे अर्ध्या जगावर तेलाचं संकट ओढवलं असतानाच या तणावाच्या परिस्थितीने धोरणात्मक किंवा आपत्कालीन तेल साठ्याचे महत्त्व जगाला जाणवून दिलं आहे. धोरणात्मक किंवा आपत्कालीन तेल बहुतेकदा तेलाच्या आयातीवर जास्त अवलंबून असलेल्या देशांद्वारे तयार केले जातात, जे सुरक्षा बफर म्हणून काम करतात, ज्यामुळे सरकारांना बाजार स्थिर करण्यास आणि जागतिक ऊर्जा प्रवाहात व्यत्यय आल्यास इंधन पुरवठा राखण्यास मदत मिळते. पण, मध्यपूर्वेमध्ये तणाव वाढला आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडथळा निर्माण होण्याची चिंता देखील वाढली आहे.

खए- म्हणजे आंतरराष्ट्रीय एनर्जी संस्थेच्या नियमानुसार जे सदस्य देश निर्यातीपेक्षा जास्त तेल आयात करतात त्यांनी किमान ९० दिवसांच्या आयातीइतका आपत्कालीन साठा राखला पाहिजे, जे सामान्यतः सरकारी सुविधा, व्यावसायिक साठवण टाक्या आणि उद्योग साठ्यांच्या रूपात ठेवले जातात.

महासत्ता अमेरिकेकडे जगात सर्वाधिक आपत्कालीन तेल साठा आहे. णड एनर्जी इन्फॉर्मेशन डमिनिस्ट्रेशननुसार, स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हमध्ये सध्या अंदाजे ४१५.४ दशलक्ष बॅरल कच्चे तेल असून खाजगी कंपन्यांकडे देखील अंदाजे ४३९.३ दशलक्ष बॅरल व्यावसायिक स्टॉक असल्याचे रॉयटर्सने म्हटले.


चीनने आपल्याकडे जगातील सर्वात मोठ्या धोरणात्मक आणि व्यावसायिक कच्च्या तेलाच्या साठ्यांपैकी जमा केल्याचे अहवालातून समोर येते. जानेवारीपर्यंत देशात सुमारे १.२ अब्ज बॅरल क्रूड साठा असल्याचे विश्र्लेषकांचे म्हणणे आहे जे अंदाजे तीन ते चार महिन्यांची मागणी पूर्ण करू शकतात. अशा स्थितीत, जागतिक तेलाच्या बाजारात व्यत्यय आला तरीही चीन यामुळे आर्थिक परिणाम कमी करू शकतो.

जपानच्या सरकारी साठ्यात अंदाजे २६० दशलक्ष बॅरल एकूण राष्ट्रीय तेल समतुल्य साठा अंदाजे ४७० लाख बॅरल कच्चे तेल जमा आहे. तसेच केवळ सरकारी साठ्यात अंदाजे १४६ दिवसांची आयात भरते, तर खाजगी कंपन्यांमध्ये अंदाजे ९० लाख बॅरल कच्चे तेल आणि आणखी १८० लाख बॅरल इंधन आहे.

अलिकडच्या सरकारी अहवालानुसार भारतात सध्या २५० लाख बॅरलपेक्षा जास्त कच्चे तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांचे साठे आहेत, जे अंदाजे दोन महिने पुरेसे आहेत. त्याचबरोबर एकूण साठा सुमारे ४००० कोटी लिटर असायचा अंदाज आहे, ज्यामुळे देशाच्या पुरवठा साखळीत सात ते आठ आठवड्यांचा बॅकअप मिळतो.

# अखेर ३३ वर्षीय हरीशला अखेर सर्वोच्च न्यायालयाने दिली इच्छामरणाची परवानगी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** मृत्यूचे भय हे बहुतेक लोकांना असत, पण जेव्हा असहाय्य वेदना असतील तिथे मृत्यूही क्षुल्लक जाणवतो. असाच एक ऐतिहासिक आणि महत्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी एक तरुणाला सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाची परवानगी दिली आहे. हा निकाल या विशिष्ट प्रकरणापुरता मर्यादित आहे असेही न्यायालयाने नमूद केले आहे.



३३ वर्षीय हरीश राणा हा पंजाब विद्यापीठाचा विद्यार्थी होता २०१३ मध्ये वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी तो पीजीच्या चौथ्या मजल्यावरून थेट खाली पडला अन् त्याच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली. तेव्हापासून म्हणेजच गेल्या १३ वर्षांपासून तो कोमामध्ये म्हणेजच व्हेजिटेटिव्ह स्टेटमध्ये अंथरुणावर खिळून होता.

श्वास घ्यायला त्याच्या गळ्याला नळी आणि अन्न भरवण्यासाठी पोटाला नळी लावण्यात आली होती. डॉक्टरांच्या अनेक प्रयत्नानंतर अनेक इलाजानंतरही त्याच्या प्रकृतीत ३३ वर्षात कोणतीही सुधारणा झाली नाही

गेली ३३ वर्षे आपल्या मुलाची सेवा करणारे आई वडील आता सरत्या वयामुळे थकले होते. आपल्या नंतर आपल्या मुलाचे काय होणार या काळजीने वृद्ध पालकांनी लाईफ सपोर्ट काढण्यासाठी सर्वोच न्यायालयात धाव घेतली.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्र्वनाथन यांच्या खंडपीठाने ही विनंती मान्य करत त्याचे लाईफ सपोर्ट काढण्याची परवानगी दिली. न्यायालयाने म्हटले की, 'जेव्हा रुग्णाच्या बरे होण्याची शक्यता कोणतीही शक्यता उरलेली नसते, तेव्हा डॉक्टरांच्या उपचारांचे कर्तव्य देखील संपुष्टात येते तेव्हा ही परवानगी देणे बंधनकारक ठरते.

एम्स रुग्णालयाला निर्देश अन् पालकांचे देखील कौतुक केले

लाईफ सपोर्ट काढले जावे यासाठी त्याला दिल्लीच्या एम्स रुग्णालयात पॉलिएक्टिव केअर मध्ये दाखल करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. गेली ३३ वर्षे स्वतःच्या मुलाची निष्काम आणि निस्वार्थपणे सेवा करणाऱ्या पालकांचे न्यायालयाने विशेष कौतुक देखील केले.

## हैद्राबादहून निघालेल्या विमानाचा अपघात

**फुकेत /वृत्तसंस्था:** हैद्राबादहून थायलंडकडे निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला लँडिंगदरम्यान गंभीर तांत्रिक बिघाड झाल्याची घटना समोर आली आहे. फुकेत इंटरनॅशनल एअरपोर्ट येथे उतरताना विमानाचे नोज व्हील निकामी झाले अन विमानात असलेल्या १३३ जणांचे जीव टांगणीला लागले.

मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडिया फ्लाईट खद९३८ ने बुधवारी सकाळी ६:४२ वाजता राजीव गांधी इंटरनॅशनल एअरपोर्ट येथून उड्डाण केले होते. नियोजित वेळेनुसार हे विमान सकाळी ११:४० वाजता फुकेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले. मात्र, लँडिंगच्या वेळी विमानाचे नोज व्हील अचानक निकामी झाले ज्यामुळे वैमानिकांना विमान धावपट्टीवर नियंत्रित करणे कठीण झाले. नोज व्हील हा विमानाचा अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जातो, कारण त्याच्या मदतीने रनवेवर विमानाचे दिशा नियंत्रण केले जाते.

# भारतासाठी चिंतेची बातमी! एल निनोचा यंदा मान्सूनवर परिणाम होणार?

## जागतिक हवामान संघटनेचा अंदाज

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** यावर्षी भारतातील मान्सूनवर 'एल निनो'चे संकट ओढवण्याची शक्यता आहे. जागतिक हवामान संघटनेच्या (थचज) ताज्या अहवालानुसार, वर्षाच्या उत्तरार्धात एल निनो सक्रिय होऊ शकतो, ज्याचा नकारात्मक परिणाम भारतीय मान्सूनवर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, तज्ज्ञांच्या मते सध्या याबाबत निश्र्चितपणे काहीही सांगणे अकाली ठरेल, परिस्थितीवर लक्ष ठेवणे गरजेचे असले तरी तत्काळ घाबरण्याचे कारण नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

केवळ मान्सूनच नव्हे, तर मार्च ते मे या काळात जगभरातील तापमानात सरासरीपेक्षा मोठी वाढ होण्याचे संकेतही जागतिक हवामान संघटनेने दिले आहेत. भारतात याचे परिणाम आतापासूनच दिसू लागले असून, देशाच्या अनेक भागांत उष्णतेच्या लाटेने नागरिक होरपळून निघत आहेत.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील तीन दिवसांत जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशमध्ये दिवसाचे तापमान सरासरीपेक्षा ५ ते ७ अंश सेल्सिअसने जास्त राहू शकते. तसेच दिल्ली-एनसीआरसह उत्तर-पश्र्चिम भारतातील मैदानी भाग, गुजरात आणि मध्य प्रदेशात ४ ते ६ अंश सेल्सिअसने जास्त तापमान नोंदवले जाण्याची शक्यता आहे.

याशिवाय, पुढील पाच दिवसांत दक्षिण-पूर्व द्वीपकल्पीय भारतातही दिवसाचे तापमान २ ते ३ अंश सेल्सिअसने सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, सध्या एल निनोबद्दल भाकीत करणे थोडे घाईचे ठरेल. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे माजी सचिव माधवन राजीवन यांनी सांगितले की, मान्सूनच्या उत्तरार्धात एल निनो मध्यम स्वरूपात सक्रिय होऊ शकतो. मात्र, सध्याच्या अंदाजांमध्ये बरीच अनिश्र्चितता आहे. जून महिन्यापर्यंत याची स्पष्ट कल्पना येईल. त्यामुळे सध्या घाबरून न जाता परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे.



भारतीय हवामान विभागाच्या कुलाबा प्रादेशिक केंद्राने कोकणातील जिल्ह्यांसाठी पुढील ५ दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, उत्तर कोकणात कडाक्याच्या उष्णतेचा इशारा देण्यात आला आहे. १० आणि ११ मार्च रोजी पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यांत तापमानाचा पारा वाढण्याची शक्यता असून नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## थोडक्यात...

### हायड्रोपोनिक गांजा जप्त

बेंगळुरू : बेंगळुरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ वर सीमाशुल्क विभागाने आंतरराष्ट्रीय अमली पदार्थांच्या तस्करीचा एक खटला उघडकीस आणला आहे. बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाच्या चेक-इन बॅगेजमधून १.५७ कोटी रुपयांचा ४.५ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. सीमाशुल्क विभागाच्या म्हणण्यानुसार, प्रवाशाने बंदी घातलेले अमली पदार्थ त्याच्या सुटकेसमध्ये एका खास पद्धतीने लपवून आणले होते. संशय आल्यावर त्याच्या सामानाची तपासणी करण्यात आली आणि अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

### आजोबांकडून नातीवर अत्याचार

जळगाव - एरंडोल येथील लांडापूर भागातील चार वर्षीय बालिकेवर तिच्याच नातेवाईक असलेल्या ५९ वर्षीय मामे आजोबांनी अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. यानंतर संतप्त जमावाने संशयिताविरुद्ध कडक कारवाईच्या मागणीसाठी राष्ट्रीय महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले. अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, आदिवासी नेत्या प्रतिभा शिंदे यांच्यासह एरंडोलचे पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड, पारोळ्याचे निरीक्षक अशोक पवार, धरणगावचे निरीक्षक सुनील पवार, कासोद्याचे सहाय्यक निरीक्षक श्रीकांत पाटील यांनी संतप्त जमावाची समजूत काढली. संशयितास अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

### विकास कामासाठी क्यूआर कोड

पुणे : पुणे महापालिकेच्या २०२६-२७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात पुणेकरांना थेट सहभाग घेता येणार आहे. शहराच्या विकासात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी महापालिकेने 'माझे पुणे, माझा अर्थसंकल्प', हा उपक्रम राबविण्यात येत आहे.आपल्या भागात कोणती आवश्यक विकासकामे झाली पाहिजे याची सूचना नागरिकांना नोंदविता येणार आहेत, त्यासाठी क्युआर कोडची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

### ड्रग्ज माफियांवर मकोका

मुंबई : सातारा जिल्ह्यातील सावरी आणि पाचुपतेवाडी येथे उघडकीस आलेल्या अमली पदार्थ निर्मितीच्या कारखान्याप्रकरणी राज्य सरकार अत्यंत कठोर पावले उचलत असून, या प्रकरणातील सर्व ११ आरोपींवर 'मकोका' (चउजउ-) लावण्यात येणार असल्याची घोषणा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

### प्रेमसंबंधातून डॉक्टरला अटक

हैदराबाद : पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने आयुष्याची अखेर केल्याप्रकरणी डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथील रहिवासी बटुला दीपिका हिने फेब्रुवारीत इंजेक्शनद्वारे औषधांचा ओव्हरडोस घेत स्वतःला संपवल्याचा आरोप आहे. डॉक्टर अमर सहस्य याच्यासोबत दीपिकाचे प्रेमसंबंध असल्याचा संशय फोन रेकॉर्ड तपासल्यानंतर पोलिसांना आला. त्यानंतर महिन्याभराने ही कारवाई करण्यात आली.

### २० कोटींची लॉटरी

कोच्ची: केरळ उच्च न्यायालयानं एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. या निकालानं चर्चेला तोंड फुटलं आहे. ख्रिसमस बंपर लॉटरीचं २० कोटी रुपयांचं बक्षीस विजेतं तिकीट जमा करणाऱ्या व्यक्तीला देण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. लॉटरीचं तिकीट मी खरेदी केलं होतं आणि ते माझ्याकडून हरवलं, असा दावा करत एक निवृत्त पोलीस अधिकारी न्यायालयात गेला होता. पण न्यायालयानं त्याचा युक्तिवाद फेटाळून लावत विरोधात निकाल दिला.

### दोन ड्रोन कोसळले, एका भारतीयासह ४ जण जखमी

**अबू धाबी :** इराण-अमेरिका-इस्रायल युद्धाच्या पार्श्र्वभूमीवर दुबईमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ (उद्दइ) दोन ड्रोन पाडण्यात आले, ज्यामध्ये एका भारतीय नागरिकासह चार जण जखमी झाले. दुबई मीडिया ऑफिसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट करत म्हटले आहे की सुरक्षा एजन्सींनी विमानतळाजवळ उडणारे दोन ड्रोन पाडले. हे ड्रोन नंतर विमानतळाजवळ पडले आणि जवळपासचे लोक जखमी झाले. दुबई मीडिया ऑफिसने अधिकृतपणे पुष्टी केली आहे की काही वेळापूर्वी दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (डीएक्सबी) परिसरात दोन ड्रोन कोसळले.

## थोडक्यात...

### प्रियमवदा कांत यांच्यासाठी सेटवर उलटे लटकणे 'न्यू नॉर्मल'झाले आहे

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' मालिकेत लतिकाची भूमिका साकारणारी अभिनेत्री प्रियमवदा कांत सध्या धाडसी स्टंट्समुळे चर्चेत आहेत. मालिकेच्या चित्रीकरणादरम्यान त्यांनी वटवाघळासारखे दीर्घकाळ उलटे लटकण्याचा स्टंट स्वतः केला. संवाद बोलत उलटे लटकणे शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक ठरल्याचे त्यांनी सांगितले. लांब केसांचा विग, संतुलन राखणे आणि सतत लटकून राहणे यामुळे तालीमही कठीण ठरली. मात्र दृश्य वास्तववादी दिसावे यासाठी त्यांनी स्टंट स्वतः करण्याचा निर्णय घेतला. मालिकेत चिनालची भूमिका साकारणारी अभिनेत्रीही या कथानकाचा महत्त्वाचा भाग आहे. सुरक्षा व स्टंट टीमच्या मदतीने हे दृश्य चित्रित करण्यात आले.

पहा प्रियमवदा कांत यांना लतिकाच्या भूमिकेत मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये दर सोमवार ते शुक्रवार रात्री ९ वाजता व १० वाजता फक्त एण्ड टीव्हीवर. तसेच सर्व एपिसोड्स कधीही पहा हिंदी झी५ वर!

### सोनी मॅक्सवर थामाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर

**मुंबई :** थामा हा विविध शैलींचा मिलाफ असलेला एक अलौकिक रोमान्स आहे, जो भावना, रहस्य आणि पौराणिक कथांची सांगड घालून प्रेमाला एका अनपेक्षित दृष्टिकोनातून आणि सखोल मानवी कथेच्या रूपात पुन्हा सादर करतो. 'ब्युटी अँड द बीस्ट' या क्लासिक कथेला वळण देऊन, हा चित्रपट सौंदर्य, संवेदनशीलता आणि 'बीस्ट' (राक्षस) या संकल्पनेचा एका नव्या, समकालीन पद्धतीने शोध घेतो. शनिवार, २१ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजता फक्त सोनी मॅक्सवर थामाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर पाहायला विसरू नका.

### ट्रुझॉन सोलरमध्ये धोरणात्मक गुंतवणूक

**छत्रपती संभाजीनगर :** सनटेक एनर्जी सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेडच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या अग्रगण्य सौर समाधान प्रदाता ट्रुझॉन सोलरमध्ये भारताच्या आयसीसी पुरुष टी-२० विश्र्वचषक २०२६ विजेत्या संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि त्याच संघातील खेळाडू तिलक वर्मा यांनी धोरणात्मक गुंतवणूक केल्याची घोषणा करण्यात आली आहे. या गुंतवणुकीमुळे भारतातील झपाट्याने विस्तारत असलेल्या अक्षय ऊर्जा क्षेत्रात कंपनीच्या वाढीला अधिक चालना मिळणार आहे.

### आयएनए सोलर चे शेअर्स बीएसई आणि एनएसई मेनबोर्डवर सूचीबद्ध

**मुंबई :** राजस्थान, जयपूर. इनसोलेशन एनर्जी लिमिटेड (आयएनएसोलर), एक आघाडीची सोलर पॅनल उत्पादक कंपनी, ने सोमवार, ९ मार्च २०२६ रोजी बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ( एनएसई ) च्या मेनबोर्डवर प्रत्येकी १ रुपयांच्या दर्शनी मूल्याचे २२,०३,९४,६२५ इक्विटी शेअर्स यशस्वीरित्या सूचीबद्ध करून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. कंपनी पूर्वी बीएसईच्या एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध होती आणि आता तिला बीएसई मेनबोर्डवर स्थलांतरित होण्यासाठी आणि एनएसईच्या भांडवली बाजार विभागावर (मेनबोर्ड) थेट सूचीबद्ध करण्यासाठी अंतिम मान्यता मिळाली आहे. सोमवारपासून कंपनीचे शेअर्स दोन्ही प्रमुख एक्सचेंजवर व्यापारासाठी उपलब्ध झाले.

### पंचायत समिती सभापतीपदी अनिता बनकर व उपसभापतीपदी भगवान आहेर

**सिल्लोड :** सिल्लोड तालुक्यातील पंचायत समितीच्या सभापती पदी भाजपाच्या अनिता सुरेश बनकर व उपसभापतीपदी भगवान आहेर यांची निवड झाली. मंत्री मंत्री अब्दुल सत्तार यांच्या मतदार संघातील दोन्हीही पंचायत





समिती भाजपने एक हाती सत्ता मिळवली यामुळे आमदार अब्दुल सत्तार यांना मोठा धक्का मानला जात आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र जी चव्हाण, मंत्री अतुलजी सावे,माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, जिल्हाध्यक्ष सुहास जी शिरसाट यांनी फोन द्वारे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पंचायत समितीचे सदस्य वृषाली मिरकर अनुराधा गवळे, गजानन जाधव, नेहा खरात, तेजस्विनी जगताप, नारायण खोमणे, सुमित्रा बनसोड,तुळसा कोठाळे यांनी एकमताने हात उंचावून भारतीय जनता पार्टीच्या सभापती उपसभापती पदाच्या उमेदवारांना पाठिंबा दिला. यावेळी भाजपा अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्र्वर पाटील मोठे, भाजपा किसान मोर्चा सरचिटणीस मकरंद जी कोरडे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, जिल्हा परिषद सदस्य सचिन वाघ, राधाकृष्ण काकडे,माजी सभापती अशोक गरुड, माजी उपसभापती अरुण काळे, कैलास जंजाळ, दिलीप दाणेकर, ज्ञानेश्र्वर तायडे, भाजपा जिल्हा सचिव कमलेश कटारिया, सुभाष मानकर, अनिल खरात, गजानन राऊत, मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लू एकनाथ हिवाळे, आत्माराम पाडळे, विजय वानखेडे, गणेश भूमकर, स्वप्निल शिनगारे, नारायण बडक, किशोर गवळे, रघुनाथ पांडव, योगेश खोमणे, भाऊसाहेब उबाळे, अमोल शेळके, साहेबराव बांबर्डे यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी भाजपा कार्यालय सिल्लोड येथे येऊन निवडीचे अभिनंदन केले.

# स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीची वेरूळ येथे बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. ११ मार्च :** वेरूळ स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची ४३२ वी जयंती सालाबादप्रमाणे १८ मार्च रोजी श्रीक्षेत्र वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गढीवर संपन्न होत आहे त्या संदर्भात आज वेरूळ गढीवर वेरूळ ग्रामस्थ व खुलताबाद तालुक्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

बैठकीचे प्रास्ताविक वेरूळ ग्रामस्थांच्या वतीने अनिल भाऊ मिसाळ यांनी केले १८ मार्च रोजी संपन्न होणाऱ्या जयंती महोत्सव सोहळ्याची निमित्ताने समितीचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी या भूमीचे ऐतिहासिक महत्त्व सांगताना छत्रपती शिवरायांचे पूर्वज बाबाजीराजे भोसले मालोजीराजे भोसले विठोजीराजे भोसले स्वराज्याचे संकल्प ज्यांनी बघितला असे शहाजीराजे भोसले त्यांचे बंधू शरीफजी राजे भोसले छत्रपती



शिवरायांचे मोठे बंधू संभाजीराजे भोसले यांचा जन्म ज्या गढी मध्ये झाला आहे अशी ही पावनभूमी एवढेच नाही शहाजीराजे व मा जिजाऊ यांच्या विवाह नंतर बराचसा काळ या पवित्र परिसरामध्ये त्यांनी घालवला आहे अशा या पावन भूमीत गेल्या आठ नऊ वर्षापासून शहाजी महाराजांची जयंती मोठ्या थाटामाटा मध्ये सर्व शिवभक्तांच्या सहकार्याने वेरूळ ग्रामस्थ करीत आहे एवढेच नाही या जागेचे महत्त्व बघता गेल्या दोन वर्षापासून शिवराज्याभिषेक सोहळ्याचे व शिवजयंतीचे आयोजन सुद्धा या पवित्र व पावन भूमीवर मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे दरवर्षी शहाजी महाराजांची जयंती दोन दिवस आपण मोठ्या उत्साहात साजरा करीत असतो पण यावर्षी हा सोहळा आपण साध्या पद्धतीने साजरा करणार आहे कारण आजोबा शहाजीराजे भोसले यांची जयंती व नातू छत्रपती संभाजी राजे यांची तिथीप्रमाणे पुण्यतिथी फाल्गुन अमावस्या १८ मार्च रोजी येत आहे.

छत्रपती संभाजी महाराजांचा बलिदान दिवस हा अतिशय वेदना व दुःख देणारा क्षण असून ज्या महाबली महापराक्रमी शहाजी महाराजांनी छत्रपती शिवराया छत्रपती संभाजी महाराज यांना घडवलं अशी शहाजी महाराजांची जयंती व तिथीप्रमाणे पुण्यतिथी १८ मार्च रोजी येत असल्यामुळे हा सोहळा यावर्षी कुठलाही गाजा वाजा न करता साध्या पद्धतीने अभिवादन वंदन करण्याचे जयंती महोत्सव समितीच्या वतीने ठरवले आहे दरवर्षी आपण जवळपास ५०००.दिवे जयंती पूर्वसंध्येला लावत असतो पण यावर्षी फक्त ५ ( पाच) दिवे जयंती महोत्सव समितीच्या वतीने जयंती पूर्वसंध्येला लावण्यात येणारा असून जयंतीच्या दिवशी म्हणजेच १८ मार्चला सकाळी हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये आजोबा शहाजीराजे भोसले व नातू छत्रपती युवराज शंभूराजे यांच्या पुण्यतिथी निमित्त एकाच वेळी वंदन व अभिवादन सकाळी साडेनऊ वाजता करण्यात येईल या ऐतिहासिक प्रसंगी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सर्व शिवभक्तांनी उपस्थित राहावे असे आव्हान जयंती महोत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष राजेंद्र पवार व कार्याध्यक्ष प्रकाश पाटील मिसाळ सरपंच वेरूळ गाव व जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे या बैठकीमध्ये जिल्हा परिषद सदस्य कैलास कापसे महेश भाऊ उबाळे अनिल भाऊ श्रीखंडे सचिन हावळे पाटील मच्छिंद्र देवकर पाटील यांनी मनोगत व काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या यावेळी महत्वपूर्ण उपस्थितीमध्ये राजेंद्र पवार मा,सरपंच प्रकाश पाटील मिसाळ, महेश उबाळे अनिल पाटील श्रीखंडे,, विकास कापसे, परसराम बारगळ,अनिल नलावडे,दिनेश अंभोरे, अनिल मिसाळ, किशोर काळे, राजूभाऊ चव्हाण,सचिन आवळे पाटील,गणपत म्हस्के, रामचंद्र राठोड, नारायण भांबर्डे महाराज,अनिल नलावडे,मच्छिंद्र देवकर पाटील,दयानंद फुलारे,आदिनाथ नागे,पाटील एकनाथ जाधव, छावा संघटनेचे रवींद्र बोडके निलेश ढवळे, अरुण नवले, गजानन लांड, गणेश नागे, यास असंख्य शिवभक्तांची उपस्थिती होती.

### ग्रामीण भागातील महिला आज सर्वच क्षेत्रात पुढे- वर्षा भुमरे

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ११ मार्च :** आज सर्वच क्षेत्रात महिला पुढे आल्या असून त्यातही ग्रामीण भागातील महिलांची कामगिरी महत्त्वाची ठरली आहे, असे मत वर्षा भुमरे यांनी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय महिला दिनी शिक्षक पतसंस्थेकडून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. संत एकनाथ महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने तालुक्यातील कर्तृत्ववान महिलांचा तसेच संस्थेच्या महिला सभासद शिक्षिकांचा सत्कार झाला. या वेळी त्या बोलत होत्या. या वेळी पैठण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा विद्या कावसानकर, सभापती वैशाली बोंबले, जिल्हा परिषद सदस्या रूपाली पवार, राधिका जगताप, जयश्री वाघमोडे, नगरसेविका कविता शिंदे, राजश्री गायकवाड, वैशाली परदेशी, मंगल हिंगे, स्नेहल धूपे, पोलिस उपनिरीक्षक कविता जगताप आदींची उपस्थिती होती.

### राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी एमजीएम विद्यापीठाचा संघ रवाना



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ११ मार्च :** असोसिएशन्स ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीचा ३९ वा राष्ट्रीय युवा महोत्सव यंदा मंगळवार, दिनांक १० मार्च २०२६ ते शनिवार, दिनांक १४ मार्च २०२६ दरम्यान चेन्नई येथील सत्यभामा इन्स्टिटयूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात संपन्न होत आहे. या महोत्सवसाठी एमजीएम विद्यापीठाचा संघ नुकताच रवाना झाला आहे.

यंदा प्रथमच नोव्हेंबर २०२५ मध्ये झोनल युथ फेस्टिवलचे एमजीएम विद्यापीठात आयोजन करण्यात आले होते. त्यात यजमान एमजीएम विद्यापीठाचा संघ प्रथमच चार कलाप्रकारासाठी नॅशनल युथ फेस्टिवलसाठी पात्र ठरलेला होता. हे चार कलाप्रकार सादरीकरण करण्यासाठी चेन्नई येथे विद्यापीठाचे विद्यार्थी सज्ज झालेले आहेत.

त्यामध्ये प्रश्नमंजुषा प्रकारात अभिजीत मस्के, उमेर सय्यद, असजद पठाण तसेच सूरवाद्यासाठी नुपूर नागर, तालवाद्यासाठी प्रसाद तरवडे आणि क्ले मॉडेल (शिल्पकला) साठी नंदवर्धन गोला हे विद्यार्थी सहभागी होत आहेत. त्यांच्यासोबत विद्यार्थी कल्याण विकास विभागाचे संचालक डॉ. आर.आर.देशमुख, संघप्रमुख म्हणून डॉ.राजू सोनवणे, डॉ.रेहाना सय्यद आणि सतीश जोगदंड हे सोबत जात आहेत.

संघाला एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, डॉ.शिव कदम व सर्व संबंधित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### सभापतीपदी भाजपचे चव्हाण तर उपसभापतीपदी संजनाताई जाधव गटाच्या गयाबाई घोडे बिनविरोध



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ११ मार्च :** सोयगाव पंचायत समितीच्या सभापती पदी भाजपने खेळी करून भाजपचे उत्तम चव्हाण यांची तर आमदार संजनाताई जाधव गटाच्या गयाबाई घोडे यांची उपसभापती बिनविरोध निवड झाली आहे.

सोयगाव पंचायत समितीच्या सभापती,उपसभापती पदाची मंगळवारी(दि.१०) अध्यासी अधिकारी एकनाथ बंगाळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी दहा वाजता सभापती,उपसभापती पदासाठी नामनिर्देशन पत्र भरण्यात आले यावेळी सभापती पदासाठी भाजपचे उत्तम चव्हाण यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाला तर उपसभापती पदासाठी आमदार संजनाताई जाधव गटाच्या गयाबाई घोडे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाला अर्जांची छाननी करून दुपारी दोन वाजता सभेला सुरुवात झाली.यावेळी सभागृहात पंचायत समिती सदस्य सविता गव्हांडे(शिंदे शिवसेना) गयाबाई घोडे(शिंदे शिवसेना) उत्तम चव्हाण(भाजप) राहूल राठोड(भाजप) जयश्री पवार(भाजप) वैभवी पाटील(उध्दव ठाकरे शिवसेना) या सहाच्या सहा सदस्यांची सभागृहात उपस्थिती होती.यावेळी सभापती पदासाठी एकमेव भाजपचे उत्तम चव्हाण यांचा अर्ज प्राप्त झाल्याने व उपसभापती पदासाठी गयाबाई घोडे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने अध्यासी अधिकारी एकनाथ बंगाळे यांनी सभापती उत्तम चव्हाण तर उपसभापती गयाबाई घोडे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली.यावेळी भाजप कडे चार सदस्य तर शिंदे शिवसेनेच्या एक उद्धव ठाकरे शिवसेनेचा एक असे सदस्य होते.भाजप कडे बहुमताचा आकडा झाल्याने सभापती उत्तम चव्हाण तर उपसभापती पदी आमदार संजनाताई जाधव गटाच्या गयाबाई घोडे यांची बिनविरोध निवड झाली.दरम्यान यावेळी तहसीलदार मनीषा मेने, गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड,सहाय्यक गटविकास अधिकारी अशोक दौड,नायब तहसीलदार राहुल पत्रिके, काकासाहेब सावळे,दीपक फुसे,आदींनी कामकाज पाहिले दरम्यान जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, तालुकाध्यक्ष संजय पाटील,जिल्हा चिटणीस सुनील गव्हांडे,जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण,शिवाजी बुडाळ,मंगेश सोहनी,मयुर मनगटे,आदींनी जल्लोष केला.


**वसमतनगर नगरपरिषद, वसमतनगर**
जिल्हा हिंगोली

(स्थापना १९५२) Phone No.02454 220175 www.basmatmc.org E-mail: cobasmatgmail.com

जा.क्र./कावी/बांधकाम/१०३४/२०२६ दिनांक : ०९/०३/२०२६

**ई-निविदा सुचना**

वैशिष्ट्यपूर्ण योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत प्रभाग क्र. १२ मधील मयुर नगर येथील ओपन स्पेसमध्ये नमो उद्यान विकसीत करणे या विकास कामांकरीता ई-टेंडर पध्दतीने दि. १२/३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते दि. २३/३/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदे विषयी http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १२/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन पहावयास मिळेल. प्राप्त निविदा शक्यतो दि. २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. तथापि, काही अपरिहार्य कारणास्तव त्याच दिवशी निविदा उघडू न शकल्यास नवीन वेळ व दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

स्वाक्षरित/-
**(सय्यद रफिक)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद वसमत**

स्वाक्षरित/-
**(सौ. सुनिता मनमोहन बाहेती)**
**नगराध्यक्षा**
नगरपरिषद वसमत


# एमजीएमचा 'सक्षमा' पुरस्कार डॉ.वंदिता श्रीवास्तव आणि भाग्यश्री जाधव यांना प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ११ मार्च :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने दरवर्षी महात्मा गांधी मिशन, एमजीएम विद्यापीठ व एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा 'सक्षमा' सन्मानाने गौरव केला जातो. २०२६ या वर्षीचा 'सक्षमा' पुरस्कार इंडियन इंस्टीट्यूट ऑफ रिमोट सेंसिंग, इस्त्रोच्या शास्त्रज्ञ डॉ.वंदिता श्रीवास्तव आणि पॅराऑलिम्पिक खेळाडू भाग्यश्री जाधव यांना आज रुक्मिणी सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

शास्त्रज्ञ डॉ.वंदिता श्रीवास्तव आणि पॅराऑलिम्पिक खेळाडू भाग्यश्री जाधव यांना श्रीमती शशिकला बोराडे, सौ. अनुराधा कदम व शोभाताई कक्कड यांच्या हस्ते आणि सौ.रचना सपकाळ व अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सक्षमा' पुरस्कार देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले. यावेळी, कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, एमजीएम



स्कूल्सच्या संचालिका डॉ.अपर्णा कक्कड, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ म्हणाले, एमजीएम विद्यापीठात आपल्या कर्तृत्वाने अनेक पदांवर महिला नेतृत्व करीत आहेत. आज देशभरात विविध पदांवर सर्वच क्षेत्रात महिला उत्तम आणि प्रतिभासंपन्नतेने कार्य करीत आहेत. सक्षमा पुरस्कार स्विकारल्याबद्दल दोन्ही सन्मानार्थीचे मी मनापासून अभिनंदन करतो.

पुरस्कार सोहळा संपन्न झाल्यानंतर एमजीएम विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त तयार केलेल्या एमजीएम संवाद या अंकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी संजना खंडारे आणि आदिती शर्मा या विद्यार्थिनींनी शास्त्रज्ञ डॉ.वंदिता श्रीवास्तव आणि पॅराऑलिम्पिक खेळाडू भाग्यश्री जाधव यांची मुलाखत घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख यांनी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशश्री मुळे यांनी तर आभार प्रा.अर्चना हारके यांनी मानले.

**महात्मा गांधी मिशन 'सक्षमा' पुरस्कार स्वरूप :**

महात्मा गांधी मिशन 'सक्षमा' पुरस्कारामध्ये सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व ५० हजार रोख रक्कम देऊन पुरस्कारार्थीला सन्मानित करण्यात येते.

सक्षमा पुरस्काराच्यावेळी दोन्ही सन्मानार्थीनींनी व्यक्त केलेले मनोगत खालीलप्रमाणे आहे :

डॉ.वंदिता श्रीवास्तव : मी शाळेत असतानाच ठरवले होते की, मला भौतिकशास्त्र विषयात आपल्याला शिक्षण शिकायचे आहे. मी आज इस्त्रो'मध्ये काम करीत आहे, याचा अभिमान आहे. मी एका छोट्या गावातून आले असून इस्त्रोपर्यंत पोहचू शकले तर कोणीही दूरदृष्टी, मेहनत, दृढनिश्र्चय, शिस्त आणि इच्छाशक्ती ठेवले तर कोणीही यशस्वी होऊ शकते. आपली आवड जोपासत त्यात कौशल्य वाढवत आत्मविश्र्वासाने आपण आपल्या जीवनात पुढे जायला हवे.

भाग्यश्री जाधव : मी माझ्या सारख्या इतर दिव्यांग खेळाडूंना पाहून मी माझी स्वतः परिस्थिती स्वीकारली. मी मेहनत करत आज इथपर्यंत पोहचले आहे. नांदेड येथील मध्यमानी आणि डॉक्टरांनी माझ्या प्रवासात खूप मोठी भूमिका निभावली आहे. ही सर्व मंडळी माझा दुसरा परिवार आहे. आयुष्यात खचून जमणार नाही, हिंमत न हारता मेहनत करीत पुढे जायला हवे. सुरुवातीला सर्वांच्या आयुष्यात संघर्ष असतो मात्र, पुढे जाण्याची ताकद ठेवली तर आयुष्यात आपण यशस्वी होतो.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## घरात एकटी असलेल्या १५ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**ढोकी, दि.११ मार्च -**

घरात एकटी असलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर गावातील एका तरुणाने घरात प्रवेश करून लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका गावातील १५ वर्षीय मुलगी (नाव व गाव गोपनीय) ही डिसेंबर २०२५ ते दि.९ मार्च २०२६ या कालावधीत घरी एकटी असल्याचे पाहून गावातील एका तरुणाने तिच्या घरात प्रवेश केला. त्यानंतर त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच हा प्रकार कुणाला सांगितल्यास जीवे ठार मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



या प्रकरणी पीडित मुलीने दि.१० मार्च २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून ढोकी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### परंडा येथे मुलींच्या आत्मनिर्भरतेसाठी कराटे प्रशिक्षण

**परंडा, दि.११ मार्च -**

परंडा येथील जिल्हा परिषद उर्दू हायस्कूलमधील शालेय विद्यार्थीनींना जिल्हा परिषद धाराशिव यांच्या वतीने राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा योजना अंतर्गत ८० तासांचे कराटे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाची सुरुवात दि.४ मार्चपासून करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामुळे मुलींना स्वरक्षणासाठी मोठा फायदा होणार असून आजच्या काळात मुलींसाठी आत्मरक्षा कौशल्य अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. प्रशालेचे मुख्याध्यापक खतीब ए.ए. यांच्या मार्गदर्शनाखाली ब्लॅक बेल्ट सेकंड डॅन प्रशिक्षक संतोष शिंदे विद्यार्थिनींना कराटेचे प्रशिक्षण देत आहेत.



### महिला दिनानिमित्त २० महिलांना शिलाई मशिन वाटप

**धाराशिव, दि.११ मार्च -**

सेरेंटीका रिन्यूएबल्सच्या यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त वाशी, भूम व कळंब तालुक्यातील २० महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. यासाठी निवडलेल्या महिलांना येरमाळा येथे १० दिवसांचे शिलाई प्रशिक्षण देण्यात आले होते. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर कळंब तालुक्यातील गौर येथील हुतात्मा स्मारक येथे प्रमाणपत्र व शिलाई मशिन वितरण कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास गौरच्या सरपंच सुषमा देशमुख, सेरेंटीका रिन्यूएबल्सचे व्हाईस प्रेसिडेंट सुरजित नारायण, व्हाईस प्रेसिडेंट (लँड) प्रकाश पटेल, प्रकल्प व्यवस्थापक हरीष कुमार तसेच उषा सिलाई स्कूलचे परेश नागपुरे उपस्थित होते.



### पांगरदरवाडी येथे ओपन जिमचे लोकार्पण

**तुळजापूर, दि.११ मार्च -**

तालुक्यातील पांगरदरवाडी येथे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व्यायामशाळा विकास अनुदान योजनेतून उभारण्यात आलेल्या ओपन जिमचे लोकार्पण गावच्या प्रथम नागरिक सरपंच सिंधू पोफळे यांच्या हस्ते संपन्न झाले. या ओपन जिममुळे गावातील नागरिकांना व्यायामासाठी उत्तम सुविधा उपलब्ध झाली असून लहान मुले, महिला तसेच पुरुष या सर्वांना येथे नियमित व्यायाम करता येणार आहे. याप्रसंगी उपसरपंच सोमनाथ शिंदे, हणमंत मते, नागनाथ शेळके, नागनाथ मारडकर, श्रीराम शेळके, भारतबाई निंबाळकर, कृष्णात पोफळे, गणेश गायकवाड, नानासाहेब चव्हाण, आण्णा मोरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.



### गुरुदेव इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**वाशी, दि.११ मार्च -**

वाशी तालुक्यातील पारगाव येथील गुरुदेव इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची मने जिंकली. एलकेजी, यूकेजी व नर्सरीच्या विद्यार्थ्यांनीही आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. महिला दिनानिमित्त गावातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच काही महिलांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल खवले यांनी केले, तर प्रवीण डोके यांनी कार्यक्रमासाठी विशेष नियोजन केले. अर्चना डोके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### धाराशिवात १४१ प्रकरणांत १.१५ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.११ मार्च -**



धाराशिव शहर वाहतूक शाखा तसेच संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान दि.१० मार्च रोजी मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध एकूण १४१ प्रकरणे नोंदवून १ लाख १५ हजार रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

# नळदुर्ग-अक्कलकोट महामार्गासाठी १०५ कोटींचा निधी मंजूर

**रस्ता दोन पदरी होणार... आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांना यश... केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मार्च -**

मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या महामार्ग ६५२ वरील नळदुर्ग ते अक्कलकोट या विभागाच्या पुनर्वसन व सुधारणेच्या कामाला अखेर केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला आहे. या प्रकल्पांतर्गत उर्वरित १४.१७ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी १०५ कोटी १३ लाख रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे. या कामामुळे हा महत्त्वाचा मार्ग दोन पदरी होणार असून प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुखकर होणार आहे.



विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत नळदुर्ग येथील जाहीर सभेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या मार्गासाठी निधी देण्याचे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर निधी मंजूर झाल्याने आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांचे विशेष आभार मानले आहेत.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रानुसार हा प्रकल्प 'ईपीसी' (Engineering, Procurement and Construction) मोडवर राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत बांधकामासाठी सुमारे १०३ कोटी ४२ लाख रुपये तर पुढील १० वर्षांच्या देखभालीसाठी सुमारे १७ कोटी १ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. एकूण १०५ कोटी १३ लाख रुपयांच्या निधीला राष्ट्रपतींच्या वतीने मंजुरी देण्यात आल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

कामात पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्यासाठी मंत्रालयाने कडक अटी घातल्या असून काम सुरू होण्यापूर्वी तसेच कामादरम्यान रस्त्याची तपासणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंत्यांना कामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल केंद्र सरकारकडे सादर करावा लागणार आहे.

या निर्णयामुळे धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

### जिल्ह्यातील पर्यटनाला चालना...

या महत्त्वाच्या मार्गामुळे नळदुर्ग, अक्कलकोट, तुळजापूर तसेच प्राचीन तेर येथील पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळणार आहे. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती वाढविण्याच्या प्रयत्नांना या निर्णयामुळे बळ मिळेल, असे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला गती मिळाली असून संतश्रेष्ठ गोरोबा काका मंदिराचे कामही प्रगतीपथावर आहे. तसेच नळदुर्ग येथे विविध विकासकामे सुरू आहेत. या नव्या मार्गामुळे ही सर्व पर्यटनस्थळे एकमेकांशी जोडली जाणार असून मोठ्या प्रमाणात पर्यटक जिल्ह्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे रोजगारनिर्मितीचे उद्दिष्टही साध्य होईल, असा विश्वास आ. पाटील यांनी व्यक्त केला.

## वॉशिंग सेंटर फोडून ४५ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मार्च -**

धाराशिव शहरातील तुळजापूर नाका परिसरात अज्ञात चोरट्यांनी वॉशिंग सेंटर फोडून सुमारे ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी सचिन शिवाजी पवार (वय २६, रा. शिंदेवाडी ता.जि. धाराशिव) यांनी तुळजापूर नाका येथील द. हंबीरे पेट्रोल पंपाजवळ वॉशिंग सेंटर चालवले आहे. ते दि.८ मार्च रोजी वॉशिंग सेंटर बंद करून गावी गेले होते. यावेळी अज्ञात चोरट्यांनी संधी साधून सेंटरमधील वॉशर मशीन व टूलकिट असा एकूण ४५ हजार रुपयांचा माल चोरून नेला.

या प्रकरणी दि.९ मार्च रोजी सचिन पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिवसेनेचे विकी चव्हाण यांची झेडपीच्या गटनेतेपदी बिनविरोध निवड

**आ. तानाजीराव सावंतच्या हस्ते चव्हाण यांचा सत्कार...**



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे नवनिर्वाचित सदस्य विकी चव्हाण यांची शिवसेना (शिंदे गट) च्या जिल्हा परिषद गटनेतेपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मुंबई येथे झालेल्या बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक तसेच आ. तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली.

सामान्य कार्यकर्त्याला गटनेतेपदाची मोठी जबाबदारी देण्यात आल्याने जिल्हाभरात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू असून विविध स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे. तेरखेडा जिल्हा परिषद गटातून निवडून आलेले विकी चव्हाण हे पेशाने पैलवान असून त्यांनी राजकारणाच्या मैदानातही दमदार कामगिरी करत विजय मिळवला आहे. जिल्ह्यात सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या या निवडणुकीत भाजप, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस तसेच इतर पक्षांचे उमेदवार रिंगणात उतरले होते. त्यामुळे ही लढत जिल्ह्यात विशेष लक्षवेधी ठरली होती.

या निवडणुकीत प्रत्यक्षात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बिभीषण खामकर आणि शिवसेनेचे विकी चव्हाण यांच्यातच मुख्य लढत रंगली होती. ऐनवेळी धनुष्यबाणाची साथ सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल झालेल्या दिग्गज नेते बिभीषण खामकर यांचा विकी चव्हाण यांनी ६३२ मतांनी पराभव करत विजय मिळवला होता. निवडणूक काळात जिल्हा परिषद निवडणुकीत आ. तानाजी सावंत यांना घेरण्याचा राजकीय डाव असल्याच्या चर्चाही राजकीय वर्तुळात रंगत होत्या. मात्र तेरखेडा जिल्हा परिषद गटातून सर्वाधिक मतांची आघाडी मिळवून देण्यात विकी चव्हाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे ते आ. सावंत यांचे जवळचे विश्वासू मानले जात असून, याच पार्श्वभूमीवर त्यांच्यावर गटनेतेपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवड १३ मार्च रोजी होणार असून हे पद कोणत्या पक्षाच्या वाट्याला जाणार याबाबतचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. ऐनवेळी राजकीय समीकरणात काय घडामोडी घडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उपळाई पाटीजवळ भीषण अपघात; कारच्या धडकेत पादचारी जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.११ मार्च -**

येरमाळा ते धाराशिव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर उपळाई पाटीजवळ झालेल्या भीषण अपघातात एका पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मयत जयराम गोपीनाथ मुंढे (वय ३७, रा. उपळाई ता. कळंब जि. धाराशिव) हे दि.२७ फेब्रुवारी रोजी येरमाळा ते धाराशिव जाणाऱ्या एनएच-५२ मार्गावर उपळाई पाटीजवळून पायी जात होते. यावेळी एमएच ११ ईसी ६६५८ क्रमांकाची कार चालक मुस्ताफा नब्बीलाल तांबोळी (रा. धोकबाभळगाव, ता. मोहोळ जि. सोलापूर) याने कार भरधाव व निष्काळजीपणे चालवत मुंढे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात जयराम मुंढे हे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी मयताचे वडील गोपीनाथ दत्तु मुंढे (वय ६५, रा. उपळाई) यांनी दि.१० मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात आरोपी कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## बावची विद्यालयात विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.११ मार्च -**

बावची विद्यालय, परंडा येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयावर विविध मॉडेल्स व प्रयोग सादर करून आपला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कल्पकता प्रभावीपणे मांडली.या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध प्रयोग स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक नारायण खैरे यांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

इयत्ता ५ वी : प्रथम डोके राज प्रमोद व बुलबुले युवराज संतोष, द्वितीय शेख मोहम्मद नवाज मुदस्सर व जेधे कुबेर आकाश, तृतीय शिंदे भार्गवी महेश. इयत्ता ६ वी : प्रथम वळवी शौर्य सुरज, दोरगे समर्थ दिपक, तिंबोळे संग्राम दादासाहेब व शेख सलमान, द्वितीय शिंदे तन्मय बालाजी, बुलबुले संस्कार सागर, मशायक मुस्तकिम मुज्जमिल व राऊत दिग्विजय युवराज, तृतीय भिस्ते सार्थक व जाधव ऋतुराज. इयत्ता ७ वी : प्रथम संभव शंकर पवार व अभिनव लक्ष्मण ढगे, द्वितीय अक्षरा माधव तिडके, मृण्मयी अभय कुलकर्णी, श्रावणी अमोल पोळ व श्रद्धा दत्ता कांबळे. इयत्ता ८ वी : प्रथम क्षिरसागर सोहम कांतीलाल व काशीद वेदांत धनाजी, द्वितीय बुरंगे आदर्श दत्तात्रय.

या कार्यक्रमास विज्ञान शिक्षक, इतर शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## नळदुर्ग बसस्थानकातील आरओ प्लॅन्ट बंद; प्रवाश्यांची तहान विकत्रीच्या पाण्यावर



**ऐन उन्हाळ्यात वृद्ध प्रवाशांची पाण्यासाठी गैरसोय**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मार्च -**

ऐन उन्हाळ्यात नळदुर्ग बसस्थानकातील आरओ प्लॅन्ट बंद पडल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. परिणामी अनेक प्रवाशांना पिण्याचे पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत असून राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन हा आरओ प्लॅन्ट सुरू करावा, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

नळदुर्ग बसस्थानकात येथील भाजप पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उमेश नाईक यांनी त्यांचे चुलते राजाभाऊ नाईक यांच्या स्मरणार्थ प्रवाशांना शुद्ध व थंडगार पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने स्वखर्चाने आरओ प्लॅन्ट बसवून दिला होता. दि.१८ ऑक्टोबर २०१६ रोजी हा आरओ प्लॅन्ट बसविण्यात आला. मात्र सध्या महामंडळाच्या दुर्लक्षामुळे हा प्लॅन्ट बंद अवस्थेत असून प्रवाशांना त्याचा लाभ मिळत नाही.

नळदुर्ग बसस्थानक हे सुमारे ६० ते ७० खेड्यांसाठी मध्यवर्ती ठिकाण मानले जाते. या बसस्थानकातून दररोज राज्य व परराज्यातील शेकडो बसगाड्या ये-जा करतात. त्यामुळे येथे कायम प्रवाशांची मोठी वर्दळ असते. विशेषतः ग्रामीण भागातील महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते. सध्या बसस्थानकात येणाऱ्या प्रवाशांना १५ रुपये देऊन पाण्याची बाटली विकत घ्यावी लागत आहे. विशेषतः सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने आणि महिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यात सवलत मिळत असल्यामुळे बसस्थानकात प्रवाशांची गर्दी वाढली आहे.

उन्हाळ्यात प्रवाशांना शुद्ध व थंडगार पाणी मिळावे या उद्देशाने बसविण्यात आलेला आरओ प्लॅन्ट तात्काळ सुरू करावा, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## तुळजापूर शहरात दूषित पाणीपुरवठा; काँग्रेस नगरसेवकांची जलशुद्धीकरण केंद्राला भेट



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ मार्च -**

तुळजापूर शहरात मागील काही दिवसांपासून पाणीपुरवठ्यातून दूषित व पिवळसर रंगाचे पाणी येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नगरसेवकांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत शहराला तात्काळ शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे.

सध्या शहरातील अनेक भागांत नळातून येणाऱ्या पाण्याला दुर्गंधी येत असून पाण्याचा रंगही बदललेला असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या संदर्भात पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करून दूषित पाणीपुरवठा का होत आहे याची तात्काळ चौकशी करावी तसेच आवश्यक दुरुस्ती व उपाययोजना करून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या तक्रार निवेदनावर काँग्रेसचे गटनेते अमोल कुतवळ, नगरसेवक रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय परमेश्वर, चिन्मय मगर तसेच नगरसेविका प्रगती लोंढे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अग्रलेख...

# स्वावलंबनाच्या ध्यासाचे दिवस...

राजकारणाच्या जगात एक वाक्य वारंवार उद्धृत केले जाते. ते असे की, राजकारणात कुणीच कुणाचा कायमचा मित्र नसतो आणि कुणीच कुणाचा कायमचा शत्रूही नसतो. हितसंबंध बदलले की समीकरणे बदलतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात तर हे वास्तव अधिक ठळकपणे प्रतिबिंबित होताना दिसते. राष्ट्रे एकमेकांशी मैत्री करतात ती मूल्यांसाठी नव्हे तर स्वार्थासाठी. राजकारणात शत्रुत्वही कायमस्वरूपी नसते. ते परिस्थितीनुसार बदलते. आजचे जग पाहिले तर हे वास्तव अधिक तीव्रपणे जाणवते. महासत्तांमधील स्पर्धा वाढत आहे, ऊर्जा संसाधनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी संघर्ष सुरू आहेत, तंत्रज्ञान हे नवे रणांगण बनले आहे आणि माहिती व सायबर हल्ले हे आधुनिक युद्धाचे प्रभावी साधन बनले आहेत. इराणवरील इस्रायल व अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे मध्यपूर्वेत निर्माण झालेला तणाव, समुद्री मार्गांवरील अनिश्चितता, तेल आणि गॅस पुरवठ्यावरील संभाव्य अडथळे आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होणारे सायबर हल्ले या पृष्ठभूमीवर भारतासारख्या विशाल पण अजूनही विकसनशील असलेल्या देशाने स्वतःच्या स्थितीकडे अत्यंत प्रामाणिकपणे पाहण्याची गरज आहे. आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने भारत जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवत असला, तरी काही अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांत देश अजूनही परकीय पुरवठ्यावर अवलंबून आहे. ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, औषधनिर्मितीसाठी लागणारे कच्चे पदार्थ, दूरसंचार उपकरणे या अनेक क्षेत्रांत भारताची परावलंबिता स्पष्ट दिसते. जागतिक संघर्षामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली तर त्याचे परिणाम भारतावर तत्काळ होऊ शकतात. म्हणूनच स्वदेशी, स्वावलंबन आणि धोरणात्मक स्वायत्तता या संकल्पना पुन्हा नव्याने महत्त्वाच्या ठरत आहेत.

आखातात संघर्ष सुरू झाल्यापासून ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न भारतासाठी सर्वांत गंभीर बनतो आहे. देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे हे खरे. पण, त्या वाढीसाठी प्रचंड ऊर्जा लागते. उद्योग, वाहतूक, शेती, शहरे या सगळ्यांना ऊर्जा हवी. या ऊर्जा पुरवठ्याचा मोठा भाग आयातीवर अवलंबून आहे. भारताला लागणाऱ्या कच्च्या तेलापैकी सुमारे पंच्याऐंशी टक्के तेल परदेशातून आणावे लागते. सौदी अरेबिया, इराक, संयुक्त अरब अमिराती आणि कुवेत हे भारताचे प्रमुख पुरवठादार आहेत. हा प्रदेश अत्यंत संवेदनशील आहे. तिथे युद्धाची किंवा तणावाची स्थिती निर्माण झाली तर त्याचा परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होतो आणि भारत त्यापासून अलिप्त राहू शकत नाही. इराणमधील संघर्ष हे त्याचे ताजे उदाहरण. पर्शियन आखातातून बाहेर पडणाऱ्या तेलवाहू जहाजांसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी. जगातील सुमारे वीस टक्के तेल व्यापार या अरुंद समुद्री मार्गातून होतो. भारताकडे येणाऱ्या तेलाचा मोठा भागही याच मार्गाने येतो. हा मार्ग इराणने बंद केला आहे. त्याचे परिणाम दिसत आहेत. सध्या आपल्याकडे साठा असला तरी भविष्यात तेलाच्या किमती प्रचंड वाढू शकतात. इंधनटंचाई निर्माण होऊ शकते आणि महागाई वाढू शकते. उद्योग आणि वाहतूक यावरही त्याचा परिणाम होईल. त्यामुळे ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न हा केवळ आर्थिक विषयांशी संबंधित नाही. तो राष्ट्रीय सुरक्षेशी व स्वायत्ततेशी देखील संबंधित आहे. नैसर्गिक वायूच्या बाबतीतही भारत मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. भारतात स्वच्छ ऊर्जा म्हणून गॅसचा वापर वाढवण्याचा प्रयत्न होत असताना या आयातीवरील अवलंबित्वही वाढत आहे. त्यामुळे ऊर्जा सुरक्षेच्या प्रश्नाकडे दीर्घकालीन दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

ऊर्जा क्षेत्रानंतर भारताची दुसरी मोठी कमजोरी म्हणजे तंत्रज्ञान क्षेत्रातील परावलंबन. आज भारतात वापरले जाणारे बहुतेक मोबाईल फोन आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे परदेशातून येतात. या उपकरणांमध्ये वापरले जाणारे सेमीकंडक्टर जवळजवळ पूर्णपणे परदेशी आहेत. जगातील चिप उत्पादनावर काही विदेशी कंपन्यांचे वर्चस्व आहे. या पुरवठा साखळीत अडथळा निर्माण झाला तर इलेक्ट्रॉनिक्स उद्योगावर मोठा परिणाम होऊ शकतो. दुसऱ्या बाजूला डिजिटल पायाभूत सुविधांच्या सुरक्षेचाही प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. भारतातील शहरांमध्ये, सरकारी कार्यालयांमध्ये आणि खाजगी प्रतिष्ठानांमध्ये मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले गेले आहेत. त्यापैकी मोठा भाग विदेशी कंपन्यांकडून आलेला आहे. या उपकरणांमध्ये जर गुप्त सॉफ्टवेअर किंवा बॅकडोअर मालवेअर असतील तर सायबर हेरगिरीची शक्यता नाकारता येत नाही. डिजिटल युगात माहिती ही सर्वांत महत्त्वाची संपत्ती आहे आणि डिजिटल सुरक्षेचा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेशी थेट संबंधित आहे. औषध उद्योगाच्या बाबतीत भारताला जगात वेगळे स्थान आहे. भारतीय औषध उद्योग जगभर औषधे पुरवतो. परंतु या उद्योगाचे एक मोठे न्यून आहे. ते म्हणजे, औषधनिर्मितीसाठी लागणारे एपीआय (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इन्ग्रेडिएन्ट्स) मोठ्या प्रमाणावर चीनमधून आयात केले जातात. या पुरवठ्यावर परिणाम झाला तर भारतातील औषध उत्पादनावरही परिणाम होऊ शकतो. कोविड महामारीच्या काळात पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे हा प्रश्न लक्षात आलाच होता. भारत पूर्णपणे परावलंबी आहे, असे समजण्याचे कारण नाही. काही क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय स्वावलंबन साधले आहे. अन्नसुरक्षा हे त्यातील सर्वांत महत्त्वाचे उदाहरण. त्यामुळे युद्धजन्य परिस्थितीत अन्नटंचाईचा धोका तुलनेने कमी आहे. अवकाश संशोधन क्षेत्रातही भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. भारताने चंद्र आणि मंगळ मोहिमा यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. तसेच भारताची स्वदेशी नेव्हिगेशन प्रणाली ही सामरिकदृष्ट्या महत्त्वाची उपलब्धी आहे. यामुळे परकीय नेव्हिगेशन प्रणालींवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी झाले आहे. संरक्षण क्षेत्रातही स्वदेशीकरणाचा प्रयत्न सुरू आहे. या क्षेत्रात अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. परावलंबन कमीत कमी असावे किंवा शक्यतो नसावेच हा वर्तमानाचा धडा आहे. आधुनिक काळात संघर्षाचा चेहरा बदलला आहे. आता युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही. सायबर हल्ल्यांद्वारे एखाद्या देशाची वीज व्यवस्था, बँकिंग प्रणाली, वाहतूक नियंत्रण आणि लष्करी संप्रेषण व्यवस्था ठप्प करता येते. इराणच्या सर्वोच्च नेत्याला संपविण्यासाठी सीसीटीव्हीच्या माध्यमातून गुप्त माहितीचे संकलन केले गेले, हे साऱ्यांना ठावूक आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेचा अविभाज्य भाग बनली आहे. या सगळ्या पृष्ठभूमीवर भारताने काही धोरणात्मक निर्णय घेऊन स्वायत्ततेला पूरक म्हणून स्वदेशी व स्वावलंबनाच्या कामाला गती दिली पाहिजे. त्यासाठी संशोधक व संशोधक संस्थांना भरीव पाठबळ दिले पाहिजे. सर्वप्रथम ऊर्जा स्वावलंबनावर भर देणे आवश्यक आहे. सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा या क्षेत्रांत भारताकडे प्रचंड क्षमता आहे. भारतात वर्षभर भरपूर सूर्यप्रकाश मिळतो. त्यामुळे सौर ऊर्जा हा देशासाठी मोठा पर्याय ठरू शकतो. अणुऊर्जा आणि हरित हायड्रोजन यासारख्या पर्यायांचाही विचार करणे आवश्यक आहे. आकस्मिकता हाताळण्यासाठी तेलसाठे वाढवणे ही दुसरी महत्त्वाची गरज आहे. तिसरे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे सेमीकंडक्टर उद्योग. २१ व्या शतकातील अर्थव्यवस्थेचा पाया सेमीकंडक्टरवर उभा आहे. मोबाईल फोनपासून कारपर्यंत आणि संगणकांपासून संरक्षण उपकरणांपर्यंत प्रत्येक क्षेत्रात चिप्स आवश्यक आहेत. त्यामुळे भारताने या क्षेत्रात गुंतवणूक व संशोधन करणे अत्यावश्यक आहे. डिजिटल सार्वभौमत्व ही देखील भविष्यातील मोठी गरज आहे. भारताने स्वतःच्या क्लाऊड सेवा, ऑपरेटिंग सिस्टिम आणि सायबर सुरक्षा प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा हे भविष्यातील सर्वांत मोठे संसाधन मानले जाते. त्यामुळे त्याचे नियंत्रण आणि संरक्षण देशाच्या हातात असणे महत्त्वाचे आहे. भारताने सर्वांशी संबंध ठेवावेत, पण कोणत्याही एका शक्तीवर पूर्णपणे अवलंबून राहू नये. तशी गरज पडू नये, हीच काळाची गरज आहे. स्वदेशीचा वर्तमानातील अर्थ केवळ बाजारातील विदेशी वस्तूंना नाकारण्यापुरता नाही. तो तंत्रज्ञान स्वायत्तता, ऊर्जा सुरक्षा, आर्थिक स्वावलंबन आणि डिजिटल सार्वभौमत्वाशी संबंधित आहे आणि या साऱ्यांचा संबंध आपल्या साऱ्यांच्या अस्तित्वाशी आहे.

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# बांधकामातही एआयची मदत

भारतीय बांधकाम उद्योग जीडीपीमध्ये सुमारे नऊ टक्के योगदान देतो. आपल्या संपूर्ण क्षमतेचा उपयोग करून घेण्यासाठी डिजिटल परिवर्तनाचा स्वीकार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पुढे येऊ घातलेल्या पायाभूत प्रकल्पांच्या प्रचंड प्रमाणाचा विचार करता उच्च दर्जा कायम ठेवत बांधकामाला गती देण्यासाठी प्रगत आणि अधिक विश्वासार्ह पद्धतींचा वेगाने अवलंब करणे आवश्यक ठरते. विकसक आणि कंत्राटदारांसह उद्योगातील विविध भागधारक आता प्रकल्प वितरणाच्या सर्व टप्प्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) क्षमतेचा शोध घेत आहेत. एआयमुळे मानवी श्रम कमी होतात आणि वेळेच्या दृष्टीने संवेदनशील निर्णयांसाठी जलद प्रतिसाद देणे शक्य होते. उद्योगाच्या अंदाजानुसार या क्षेत्रातील एआय बाजारपेठ २०२५ मध्ये सुमारे २.१ अब्ज डॉलर इतकी असून पुढील पाच वर्षांमध्ये जवळपास दुप्पट वाढून २०३० पर्यंत ५.२ ते ५.३ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. एआयसारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादकतेत २०-३० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. या पृष्ठभूमीवर प्रकल्प नियोजन, डिझाईन, खरेदी, बांधकाम आणि संचालन या सर्व टप्प्यांमधील निकालांवर प्रभाव टाकणारा महत्त्वाचा घटक म्हणून एआय उदयास येत आहे. बांधकाम प्रकल्पांमध्ये बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग (बीआयएम) आणि भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) यांसारखी साधने आधीच वापरात आहेत. त्यात थेट प्रक्षेपण करणारे कॅमेरे आणि उपग्रह प्रतिमांचा वापर केला जातो. कंपन्या यासंदर्भात गोळा केलेल्या माहितीला (डेटा) विश्लेषणाशी जोडून संपूर्ण मूल्यसाखळीत एआयचा वापर करीत आहेत. त्यामुळे जलद आणि अधिक माहितीपूर्ण निर्णय घेणे शक्य होते.

नियोजन टप्प्यात मागणी विश्लेषण आणि मार्ग अनुकूलनासाठी एआयचा वापर केला जात आहे. मागणी विश्लेषण हे पूर्वीचा डेटा, हंगामी नमुने आणि मान्सूनशी संबंधित प्रवृत्ती यावर आधारित असून सुरुवातीच्या प्रकल्प नियोजनाला आधार देते. मार्ग अनुकूलनात हॉटस्पॉट मॅपिंग, वाहतूक प्रवाह डेटा आणि हंगामी डेटा संचांचा वापर करून योग्य संरेखन निश्चित करण्यात मदत होते. अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकामाच्या दृष्टीने, ग्राहक आणि क्लायंट मॅपिंग तसेच जोखीम मूल्यांकनासाठीही एआययचा वापर होत आहे. उदाहरणार्थ, 'रोबोटिक प्रोसेस ऑटोमेशन' देशपातळीवरील राजकीय, आर्थिक आणि भौगोलिक माहिती तसेच स्पर्धकांशी संबंधित डेटा एकत्रित करून त्यांना एआय स्तर असलेल्या विश्लेषण साधनांमध्ये समाविष्ट करू शकतो. यामुळे पूर्वी हाताने संकलित करण्यासाठी महिन्यांचा कालावधी घेणारी सतत जोखीम मूल्यांकन प्रक्रिया शक्य होते. अभियांत्रिकी आणि डिझाईन क्षेत्रात, अनुकूलन आणि पर्याय निर्मिती या दोन्ही पातळ्यांवर एआयचा स्वीकार दिसून येतो. नदी ओलांडणे, जंगलातील मार्ग किंवा रेल्वे क्रॉसिंग यांसारख्या प्रत्यक्ष अडचणींचा विचार करून अधिक योग्य संरेखन ओळखण्यासाठी एआय स्तरांचा वापर केला जात आहे. संकल्पनात्मक टप्प्यावर पूल किंवा मेट्रो मार्गांसारख्या मालमत्तांसाठी अनेक डिझाईन पर्याय निर्माण करण्यासाठी 'जनरेटिव्ह एआय'चा प्रयोग सुरू आहे. त्यामुळे जलद मूल्यमापन करून डिझाईन चक्राच्या सुरुवातीलाच व्यवहार्य पर्याय निवडणे शक्य होते. खरेदी आणि अंमलबजावणी टप्प्यात, खर्च आणि लॉजिस्टिक्स व्यवस्थापन सुकर करण्यासाठी एआयचा वापर होत आहे.

वस्तूंच्या किमतींचे नियमित निरीक्षण करून खर्च मूल्यांकन मजबूत करण्यासाठी विश्लेषण स्तरांचा वापर केला जातो. लॉजिस्टिक्स हे आणखी एक क्षेत्र आहे, जिथे स्वीकार अधिक ठोस स्वरूपात दिसतो. उपकरणांवर बसवलेली जीपीएस साधने मार्ग अनुकूलन, वापर क्षमता सुधारणा आणि इंधन खर्च कमी करण्यासाठी वापरली जातात. प्लांट आणि यंत्रसामग्री ट्रॅकिंग जीपीएस ट्रॅकर्स आणि इंधन व्यवस्थापन प्रणालीद्वारे केले जाते. करार व्यवस्थापन डिजिटलदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी काही अनुप्रयोगांचाही शोध घेतला जात आहे. बांधकाम आणि संचालन हे एआय आधारित तैनातीची सर्वाधिक दृश्यमान क्षेत्रे आहेत. नियमित निरीक्षणासाठी ड्रोन आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) चा वापर केला जातो, तर ड्रोन प्रतिमा आणि मशीन लर्निंगच्या संयोगातून ट्रान्समिशन टॉवर आणि रेल्वे पूल यांसारख्या मालमत्तांसाठी स्वयंचलित तपासणी अहवाल तयार केले जातात. विशेषतः बायोमेट्रिक प्रणाली तैनात करणे अवघड असते, अशा प्रकल्पांमध्ये कामगारांची उपस्थिती हे आणखी एक एआय सक्रिय वापर क्षेत्र आहे. या पद्धतीत निश्चित परिघात प्रवेश ओळखण्यासाठी 'जिओफेन्सिंग'चा वापर केला जातो आणि उपस्थिती नोंदविण्यासाठी चेहरा ओळख तंत्रज्ञान वापरले जाते. संचालन आणि देखभाल, तपासणी, निरीक्षण आणि मालमत्ता कार्य प्रदर्शन ट्रॅकिंगसाठीही एआयचा वापर होत आहे. सक्रिय वापर प्रकरणांची संख्या वाढत असली, तरी स्वीकार अजूनही असमान आणि अनेक घटकांमुळे मर्यादित आहे.

याबाबत पहिला मुद्दा म्हणजे बदलाला होणारा प्रतिकार. वाहतूक प्रकल्प अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात राबवले जातात आणि डिझाईन आणि अंमलबजावणी वेळापत्रकात विलंब होण्याचा धोका जाणवला, तर भागधारक नवी साधने आणण्यास संकोच करतात. दुसरे म्हणजे प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता. एआय साधनांसाठी कौशल्यविकास आवश्यक असून विद्यमान व्यावसायिकांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. डेटाशी संबंधित अडचणी अनेक समस्यांच्या मुळाशी आहेत. एआय मोठ्या डेटा संचांवर अवलंबून असतो, परंतु डेटा गुणवत्तेचे आणि विखंडनाचे प्रश्न उद्‌भवतात. मालकी आणि परवानग्यांबाबतही प्रश्न उपस्थित होतात. गर्दीच्या शहरांमध्ये संरेखन डिझाईन अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक असलेला 'स्ट्रीट-लेव्हल डेटा', विशेषतः बायोमेट्रिक प्रणाली तैनात करणे अवघड असते. अशा प्रकल्पांमध्ये अनेकदा डाटा उपलब्ध नसतो. त्यामुळे मार्ग डिझाईन आणि निर्णयप्रक्रियेसाठी एआय साधनांचा वापर मर्यादित राहतो. नेटवर्क मर्यादाही गुंतागुंत वाढवतात. अनेक प्रकल्प दुर्गम भागांमधून जात असल्याने इंटरनेट उपलब्धता मर्यादित असते आणि रिअल-टाईम आयओटी निरीक्षणावर परिणाम होतो. यासाठी पर्याय म्हणून कालांतराने ड्रोन किंवा लिडार सर्वेक्षण, त्यांचे 'थ्री डी बीम' मॉडेलमध्ये रूपांतर आणि ऑफलाईन डेटा संकलन करून नंतर समक्रमित करणाऱ्या प्रणाली वापरल्या जातात. परिणाम वापरकर्त्यांच्या क्षमतेशी आणि प्रशासकीय चौकटीशी निकट संबंधित असतात.

एआय तज्ज्ञांना जलद आणि अधिक चांगले परिणाम देण्यास मदत करू शकते, परंतु या क्षेत्रातील सखोल ज्ञान आणि नियंत्रण नसल्यास त्यातून नवीन जोखमी उद्‌भवू शकतात. व्यापक स्वीकारासाठी नेतृत्व प्रशिक्षण, पुढील तीन ते चार वर्षांसाठी स्पष्ट गुंतवणूक परतावा, अपेक्षांसह निश्चित आराखडा आणि डेटा-आधारित निर्णय संस्कृती आवश्यक आहे. अलिकडच्या वर्षांमध्ये एआयचा स्वीकार अर्थपूर्ण गतीने वाढला आहे. तथापि, प्रभावी अंमलबजावणीसाठी तंत्रज्ञानकेंद्रित नव्हे, तर समस्याकेंद्रित दृष्टिकोन आवश्यक आहे. केवळ पुढील प्रवाह म्हणून एआय तैनात करण्याऐवजी स्पष्ट व्यावसायिक समस्या ओळखून उपाय म्हणून एआय वापरणे परिणामकारक ठरते. यामुळे अंमलबजावणी परिणामांशी जोडलेली राहते, वापरकर्त्यांचा स्वीकार वाढतो आणि एआयला स्वतंत्र उपक्रम न मानता दैनंदिन प्रकल्प व्यवस्थापनात समाविष्ट केले जाते. प्रकल्प प्रत्यक्षात ज्या पद्धतीने चालतात, त्यावर आधारित व्यवहार्य अंमलबजावणी दृष्टिकोन आवश्यक असतो. नेतृत्वाची तयारी, एआय क्षमतांची मूलभूत समज, मोजता येण्याजोगे मूल्य देणाऱ्या क्षेत्रांची स्पष्टता आणि गुंतवणुकीला अपेक्षित परिणामांशी जोडणारा बहुवर्षीय आराखडा हे सर्व निर्णायक ठरणार आहे. प्रकल्प अंमलबजावणी पातळीवर नियंत्रणासह वापर हा केंद्रस्थानी राहिला पाहिजे. क्षेत्र तज्ज्ञतेला प्राधान्य देत एआयने सहायक भूमिका बजावली पाहिजे. वेग आणि विश्वसनीयता यांच्यातील संतुलन राखल्यास एआय प्रकल्प शिस्त बळकट करेल आणि अनियंत्रित निष्कर्षांमुळे निर्माण होणाऱ्या नव्या जोखमी टळतील.

शहरी सक्षमता आणि नियोजन हेही एआय वापराचे उदयोन्मुख क्षेत्र आहे. तिथे स्पष्ट आणि संदर्भाधारित उद्दिष्टांसह तैनाती शक्य आहे. 'आयओटी'आधारित पद्धतींमुळे पावसाच्या परिणामांचा अंदाज करणे आणि शहरी जलप्रणालीत पाणी कसे वाहते, हे समजणे शक्य होते. त्यामुळे पूर व्यवस्थापनासाठी अचूक प्रतिसाद देता येतो. वाहतूक कोंडी आणि प्रदूषण ही अशी क्षेत्रे आहेत, जिथे सुधारित डेटा वापर आणि लक्षित विश्लेषणामुळे मूळ समस्या ओळखून अधिक प्रभावी हस्तक्षेप करता येतात. मेट्रो संचालनात ऊर्जा व्यवस्थापन हे आणखी एक आशादायक क्षेत्र असून रिअल-टाईम निरीक्षण आणि पूर्वानुमान साधनांद्वारे नियोजन सुधारता येते आणि अनपेक्षित खर्चवाढ टाळता येते.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# रेशन कार्ड नियमांचा अंमल प्रभावीपणे व्हावा

रेशन कार्ड हे काहींसाठी महत्त्वाच्या अनेक कागदपत्रांपैकी एक शासकीय दस्तावेज आहे तर अनेकांसाठी अन्नधान्यांची हमी देणारे पुस्तक आहे. देशात १९४० म्हणजे ब्रिटिश साम्राज्यातच राशन व्यवस्था सुरू झाली. स्वातंत्र्यानंतरही ती कायम ठेवण्यात आली. १९६० पासून ही व्यवस्था अधिक व्यापक करण्याला सुरुवात झाली. १९६५ साली भारतीय अन्न महामंडळाची स्थापना (एफसीआय) करण्यात आली. राशन वितरण व्यवस्थेत जून १९९७ मध्ये आणखी काही बदल करून गरिबांना त्याचा लाभ मिळेल यासाठी धोरणात्मक प्रयत्न सुरू झाले. पुढे आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्यात आले. ५ जुलै २०१३ रोजी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा करण्यात आला. तेव्हापासून पात्र कुटुंबांना अनुदानित दरात अन्नधान्य मिळणे हा कायदेशीर हक्क आहे. ग्रामीण भागातील ७५ टक्के तर शहरी भागातील ५० टक्के लोकसंख्या या कायद्याच्या कक्षेत आली. धान्य देऊ न शकल्यास राज्य सरकारांना अन्न सुरक्षा भत्ता द्यावा लागतो. महाराष्ट्रात या कायद्याची अंमलबजावणी १ फेब्रुवारी २०१४ पासून सुरू झाली. ९ मार्च २०२६ पर्यंत राज्यात सर्व प्रकारचे २ कोटी ५५ लाख २२ हजार ९१४ रेशन कार्डधारक आहेत. ९ कोटी ८७ लाख ६७ हजार ९६६ लाभार्थी आहेत. ५९ हजार ८४० रेशन दुकानातून अन्नधान्यांचे वितरण होते. इतकी व्यापक ही व्यवस्था आहे आणि ऑनलाईन तंत्रज्ञानाच्या मदतीने ती चालविली जात असल्याने धान्याची काळाबाजारी कमी झाली असून रेशन कार्डाची इतर कामे गतीने होत आहेत.

पात्र लाभार्थी कोणते हा यातला सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. शहरी भागात ५९ हजार व ग्रामीण भागात ४४ हजारापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना प्राधान्य कुटुंब लाभार्थी (पीएचएच) संबोधले जाते. पूर्वी त्याला बीपीएल म्हणायचे. अंत्योदय योजनेत बीपीएलपेक्षाही कमी उत्पन्न असलेल्यांना घेण्यात आले आहे. दारिद्र्यरेषेच्यावर (एपीएल) आणि बिगर प्राधान्य कुटुंब (एनपीएच), एपीएल शुभ्र शिधापत्रिका असे एकूण रेशनकार्डचे पाच प्रकार आहेत. यातील पहिल्या दोन प्रकारातलेच लाभार्थी सर्वांत जास्त आहेत. त्या खालोखाल केशरी कार्डधारक आहेत. एकूण लाभार्थींची जी संख्या दाखविली आहे, त्यात जवळपास ७५ टक्के लाभार्थी हे उपरोक्त तीन प्रकारातलेच आहे. सांगायचा मुद्दा असा की, जे निकष रेशन कार्ड देण्यासाठी आहेत, ते पाळले जातात का आणि तपासणी करून कार्ड दिले जाते का? प्राधान्य कुटुंब व अंत्योदयसाठी उत्पन्नाची जी मर्यादा ठरविण्यात आली आहे, त्या निकषात एक तरी कुटुंब बसते का? इतक्या कमी वार्षिक उत्पन्नात (काही अपवाद असू शकतात) कोणतेच कुटुंब जगू शकत नाही, हे उघड सत्य असताना याच निकषांचा आधार घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून रेशन कार्ड दिले जात आहेत. शासकीय कागदावरच्या नियमांचा आधार घेऊन सखोल तपासणी केली तर निम्म्यापेक्षा जास्त लाभार्थी एका क्षणात अन्नधान्यांच्या लाभासाठी अपात्र होतात. नेमकी हीच बाब केंद्र आणि राज्य शासनाच्या लक्षात आल्याचे दिसत असल्याने त्यांनी नव्या धोरणाचे सुतोवाच केले आहे.

सरकारचे 'वन नेशन, वन रेशनकार्ड' योजनेअंतर्गत नवे धोरण १ एप्रिल २०२६ पासून अमलात येणार आहे. खऱ्या गरजू कुटुंबांना लाभ देणे, अपात्र लाभार्थींची नावे रेशन यादीतून कायमची वगळणे हा नव्या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. नवीन नियमांनुसार रेशन कार्डासाठी पात्रता ठरवताना कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न, मालमत्ता, वाहन आणि घरातील सुविधा यांचा विचार केला जाणार आहे. शहरी भागातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख आणि ग्रामीण भागातील कुटुंबाचे उत्पन्न २ लाखांपेक्षा जास्त असल्यास ते अपात्र ठरविले जाणार आहेत. ज्या कुटुंबाकडे कार, ट्रॅक्टर किंवा इतर चारचाकी वाहन असेल त्यांना रेशनचा लाभ मिळणार नाही. मालमत्ता निकषानुसार १०० चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळाचा प्लॉट, फ्लॅट किंवा स्वतःचे पक्के घर असलेल्या लाभार्थींना देखील योजनेतून वगळले जाणार आहे. तपासणीत चुकीची माहिती देऊन रेशन लाभ घेतल्याचे आढळले, तर केवळ त्यांचे रेशन कार्डच रद्द होणार नाही, तर आतापर्यंत घेतलेल्या धान्याची वसुली बाजारभावानुसार केली जाईल आणि कायदेशीर कारवाई देखील होणार आहे. बऱ्याच सुधारणा करून नवे निकष तयार करण्यात आले आहेत. वाचता क्षणीच ते कडक वाटतात. पण, या निकषांची कोटेकोर अंमलबजावणी झाली तर विद्यमान स्थितीतले निम्म्यापेक्षा जास्त लाभार्थी बाहेर होतात. पूर्वीचे आणि आताचे उत्पन्नाचे निकष तुलनात्मकपणे जवळपास सारखेच आहेत. कारण, दरडोई उत्पन्न वाढले आहे. केलेल्या नियमांची प्रामाणिक अंमलबजावणी केली तरच त्या नियमांची किंमत असते. सरकाने इतके तरी ध्यानात ठेवावे, ही अपेक्षा!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# स्कंदपुराण

१८ पुराणातील मोठे पुराण म्हणून या पुराणाचा उल्लेख आहे. स्कंद हे नाव भगवान शिव आणि पार्वती यांचे पुत्र कार्तिकेय यांचे नाव आहे. खरं तर हे पुराण भगवान शिवांनी पार्वतीला सांगितले. पार्वतींनी हे पुराण आपला पुत्र कार्तिकेय म्हणजे स्कंदाला सांगितले. स्कंदाने ते नंदींना सांगितले. नंदी भगवंताने दत्तांना सांगितले. दत्तांनी व्यास महर्षी यांना तर व्यासांनी ते सुतांना सांगितले. या पुराणाचे विशेष विश्लेषण स्कंद यांनी सांगितले म्हणून या पुराणाला स्कंद पुराण म्हणतात.

सुप्रसिद्ध सत्यनारायण कथा याच पुराणातील कथा आहे. प्रसिद्ध असे सोमवार व्रत, शिवरात्री व्रत, प्रदोष व्रत, एकादशी व्रत याच पुराणात असून सर्वत्र साजरा होणारा व्यंकटेश-पद्मावती विवाह सोहळा सर्वप्रथम याच पुराणात आहे. भगवान जगन्नाथाची काष्ठमयी प्रतिमा कथा, नर्मदा परिक्रमा महिमा इथेच आहे. अल्पभेद असलेले सुप्रसिद्ध विष्णुसहस्रनामही इथेच आहे. तुळशी विवाह सोहळा या पुराणात आहे. दिवाळी सण म्हणजे वसु-बारस ते भाऊबीज या दिवसाचे महिमान आणि त्याचा विधी, परंपरा या पुराणात सांगितल्या आहेत. विशेषतः लक्ष्मीपूजन आणि भाऊबीज याचा विशेष उल्लेख आहे. आवळीचे पूजन अ ावळ्याखाली दीपपूजन इथे आहे. याशिवाय महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साजरा होणारा भाद्रपदातील ज्येष्ठा गौरीपूजन विधी आणि महात्म्य याच पुराणात आहे. अक्षयतृतीया साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्ताचे महत्त्व इथेच आहे.

या पुराणाचे सात खंड म्हणजे भाग आहेत. माहेश्वर खंड, वैष्णव खंड, ब्राह्म खंड, काशी खंड, अवंती खंड, नागर खंड आणि प्रभास खंड असे सात खंड असून काशी खंड आणि रेवा खंड प्रसिद्ध आहेत. सत्यनारायण कथा रेवाखंडात आहे. सातही खंडांचे उपखंड किंवा उपविभाग आहेत. स्कंदपुराण संहितात्मक विभागले आहे. सनत्कुमार संहिता, शंकर संहिता, ब्राह्मसंहिता, सौर संहिता, वैष्णव संहिता, सूत संहिता असे विभाजन आहे. या पुराणात बदरीकाश्रम, अयोध्या, प्रभास क्षेत्र अशा विविध तीर्थांचे वर्णन आहे. गंगा, यमुना, सरस्वती, नर्मदा या नद्यांच्या उद्‌गम कथा याच पुराणात आहेत. रामायण, भागवत इत्यादी ग्रंथांचे महात्म्य इथे सांगितले आहे.




सती चरित्र, दक्षयज्ञ, पार्वती जन्म, शिव-पार्वती विवाह, कार्तिकेय म्हणजे स्कंद जन्म, तारकासुर वध कथा या पुराणात आहे. विश्वकर्म्याच्या तपासून वृत्रासुर उत्पत्ती, दधीची ऋषी द्वारा अस्थिदान ही कथा, वराह अवतार, वामनादी दश अवतार कथा यात आहेत. रामेश्वर धनुष्कोटी येथील राम सेतू, गोकर्ण क्षेत्र सोबतच रुद्राक्ष, रुद्राध्यायी, शालिग्राम विग्रह, नर्मदेश्वर शिवलिंग महिमा या पुराणात आहे. विंध्य-नारद संवाद, स्कंद-अगस्ती संवाद, जय-विजय चरित्र, घटोत्कच विवाह, बर्बरिक जन्म इत्यादी कथा या पुराणात आहे. बर्बरिक ज्यांना आपण खाटू श्याम म्हणतो, त्यांची यथार्थ कथा, त्यांचे सामर्थ्य, भगवान कृष्णाने त्यांचे मस्तक का उडविले, मस्तकाला पूजनीय स्थान देऊन त्यांना मिळालेले वरदान पूर्ण केल्याची कथा स्कंद पुराणात आहे.

काशीचे महात्म्य, शिवांचे काशीत आगमन, मणिकर्णिका उत्पत्ती कथा, विश्वनाथ वैभव, काशीतील विविध लिंग, काशियात्रा फळ असे काशीचे महत्त्व याच पुराणात आहे. कार्तिक महिन्याचे महत्त्व, कार्तिक स्नान, मार्गशीर्ष महात्म्य, वैशाख महात्म्य इथे दिले आहे. रघू राजा आणि कौत्साची दसऱ्याची कथा, दत्तावतार कथा, उज्जैन महाकाल, क्षिप्रा महिमा, ओंकार मांधाता, अमरकंटकचे महत्त्व या पुराणात आहे. स्त्रीभ्रूण हत्या त्या काळात होत नसत; कारण स्कंद पुराणात कन्येचे महत्त्व खूपच सुंदर विशद केले आहे.

'दशपुत्रसमा कन्या दशपुत्रान्प्रवर्द्धयन्।
यत्फलं लभते मर्त्यस्तल्लभ्यं कन्ययैकया ॥'

एका मुलीचे पालनपोषण दहा पुत्रांच्या पालनासमान असा स्पष्ट संकेत या पुराणात आहे. वृक्षारोपणाचे महत्त्व आणि त्यातल्या त्यात प्राणवायू देणारे, फळफळावळ देणारे तथा औषधीय वनस्पती यांचे संवर्धन केल्यास पुण्य लाभते, हे स्कंद पुराण वृक्षांच्या नावासह सांगते.

'अश्वत्थमेकं पिचुमन्दमेकं न्यग्रोधमेकं दश चिञ्चिणीकान्।
कपित्थबिल्वाऽऽमलकत्रयञ्च पञ्चाऽऽम्रमुप्त्वा नरकन्न पश्येत् ॥'

जो कोणी एक पिंपळ, एक कडूलिंब, एक वटवृक्ष, दहा चिंचेची झाडे, तीन कविट, तीन बेल, तीन आवळा आणि पाच आंब्याची झाडे लावतो त्याला नरकाचे तोंडही दिसत नाही तर तो स्वर्गात स्थान मिळवितो. स्कंद पुराण हे यथार्थ पुराण असून व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्ठी विचार मांडणारे सुंदर पुराण आहे. सर्वांनी ते अवश्य वाचले पाहिजे.

९८२२२६२७३५

### हिंदू संमेलने काळाची गरज

आज देशभरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी महोत्सव सुरू आहे. शताब्दी महोत्सवामध्ये कुठेही मनोरंजनात्मक कार्यक्रम होत नसून देश घडविण्यासाठी लागणारी पिढी घडवण्याचं काम सुरू आहे. देशाप्रति स्वाभिमान, आपल्या धर्माबद्दल जागृती हे कार्य करता यावे यासाठी नवीन पिढी तयार व्हावी या उद्देशाने कार्य सुरू आहे. संघाने सांगितलेली पंचसूत्री यावर काम सुरू आहे. कुटुंब प्रबोधन हा विषय तसा बघितला तर फार जुना आहे. पूर्वी प्रत्येक घरात संयुक्त कुटुंब पद्धती होती. घरात आजी, आजोबा नातवांना घेऊन दिवे लावणीला रामरक्षा, भीमरूपी शिकवायचे. उत्तम धार्मिक संस्कार नातवांवर व्हायचे. घरातील मुलींना संध्याकाळच्या आत घरात यायला सांगायचे. सर्व जण एकत्र जेवायला बसायचे. त्यावेळेस, मुलांचा अभ्यास, खेळ, त्यांची प्रगती, कुटुंबासमोरील समस्या यावर चर्चा होत असे. त्यामुळे कुटुंबामध्ये संवाद असायचा. परंतु आता पूर्ण चित्र बदललेलं आहे. कुटुंब ही संकल्पना संपुष्टात येते की काय अशी शंका यायला लागली आहे. दोन किंवा तीन माणसं कुटुंबात असतात. त्यातही संवाद नसतो १२-१२ तास काम करून एकमेकांशी न बोलता दिवस जातो. त्यामुळे असलेला ताण, तणाव याबद्दल कोणीही बोलत नाही. त्यामुळे स्वास्थ्य बिघडते व कुटुंबाची हानी होते. संघाने कुटुंब प्रबोधन हा विषयच याकरिता घेतला की समाजातील प्रत्येक घटकाशी संपर्क साधून त्यांचे विचार, त्यांच्या समस्या ऐकून त्यांना मुख्य प्रवाहात आणून आपल्या धर्माशी सुसंगत कार्य वाढवण्यासाठी उपयोग व्हावा. तसेच त्यांचे कुटुंब सुशिक्षित, सुसंस्कारित व्हावे व सज्जनशक्तीचा विकास व्हावा व देशाच्या जडणघडणीमध्ये योगदान द्यावे हाच एकमेव उद्देश आहे. एकदा का उद्देश सफल झाला की पर्यावरण, समरसता, स्वदेशी हे घटक सुद्धा सर्व समाजाच्या अंगवळणी पडून एक सशक्त समाज निर्माण व्हायला मदत होईल. हीच संकल्पना घेऊन देशभरात हिंदू संमेलने आयोजित केली जात आहे. या संमेलनांच्या माध्यमातून सामाजिक समरसता, जातिपातीपासून मुक्तता, सर्व हिंदू धर्मीयांची एकता, सज्जनशक्तीची एकी हे सर्व साधले जाणार आहे आणि हे आजच्या परिस्थितीत खूप आवश्यक आहे. लव्ह जिहाद, जमीन जिहाद, दहशतवादी कारवाया या सर्वांना नेस्तनाबूत करायचे असेल तर अशी हिंदू संमेलने घेणे आवश्यक आहे.



**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

## वाचक पत्रे

### कार्यकर्ते कार्यक्रमापुरते, पक्ष नेत्यांच्या भरवशावर?

आजच्या राजकारणात एक गंभीर वास्तव दिसून येत आहे. राजकीय पक्षांची ताकद एकेकाळी विचारसरणी, संघटन आणि कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर उभी असायची. परंतु सध्याच्या काळात अनेक पक्षांचे अस्तित्व आणि चालना प्रामुख्याने लोकप्रतिनिधी आणि नेत्यांच्या भरवशावर अवलंबून असल्याचे दिसते. पूर्वी कार्यकर्ते हे पक्षाचे आधारस्तंभ मानले जायचे. गावोगावी, शहरात विचार पोहोचवणे, जनतेच्या समस्या मांडणे आणि पक्षाच्या धोरणांसाठी लोकांमध्ये जनजागृती करणे ही त्यांची भूमिका असायची. आज मात्र अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांची भूमिका कार्यक्रमापुरती मर्यादित झाल्याचे दिसते. एखादा मोठा कार्यक्रम, सभा किंवा दौरा असेल तेव्हा कार्यकर्त्यांची उपस्थिती दिसते, पण रोजच्या जनतेच्या समस्या प्रश्नांवर काम करणारे कार्यकर्ते कमी होत चालले आहेत. दुसरीकडे, पक्षाचे संपूर्ण राजकारण काही मोजक्या नेत्यांभोवती फिरताना दिसते. त्यांच्या लोकप्रियतेवर, आर्थिक व संघटनात्मक ताकदीवर पक्ष उभा राहतो. त्यामुळे पक्षाची विचारसरणी आणि कार्यकर्त्यांचे स्थान दुय्यम ठरत असल्याची टीका अनेक राजकीय विश्लेषक करत आहेत. लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्ष हे केवळ नेत्यांचे व्यासपीठ नसते, तर ते समाजाच्या विविध घटकांना जोडणारे माध्यम असते. जर कार्यकर्ते फक्त कार्यक्रमापुरते सक्रिय राहिले आणि पक्ष फक्त नेत्यांच्या भरवशावर चालू लागले, त्यामुळे लोकशाहीचा पाया कमकुवत होण्याची भीती निर्माण होते. म्हणूनच आज गरज आहे ती राजकीय पक्षांनी पुन्हा संघटन बळकट करण्याची. कार्यकर्त्यांना निर्णय प्रक्रियेत स्थान देणे, त्यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे आणि जनतेशी थेट संवाद वाढवणे आवश्यक आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### थोर महापुरुषांचे कार्य पुढे यावे

भारतीय स्वातंत्र्यलढा आणि राष्ट्रनिर्मितीतील विविध महापुरुषांचे योगदान वाचकांसमोर मांडण्याचे कार्य तरुण भारतने सातत्याने करावे. इतिहासाचे वस्तुनिष्ठ चित्रण ही आजची गरज आहे.

**राजू इनामदार**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आहार व तणाव रहित जीवन यावरच मानवी आरोग्य अवलंबून आहे - युवासंत चंद्रकांत (दादासाहेब ) मोरे

## परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य तसेच रक्तदान शिबीर संपन्न

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव** | गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूद्ध माजलगाव च्या तर्फे आयोजित परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, आपले आरोग्य आपल्या आहारावर अवलंबून आहे, मानवी आरोग्यासाठी षड्रस आवश्यक असते. सकस, सेंद्रिय अन्न यामुळे आरोग्य सुदृढ राहते. याबरोबरच आयुर्वेद, आजीबाईचा बटवा, घरगुती दैनंदिन वापरातील औषधी वस्तू याविषयी अनमोल माहिती दिली. मानवी आरोग्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे ताणतणाव आहे. आरोग्यदायी जीवनासाठी तणाव रहित राहिले पाहिजे. या शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलन, श्री स्वामी समर्थ महाराज, धन्वंतरी, छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पूजन करून झाले.

यावेळी भव्य रक्तदान शिबीरही घेण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये २१३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या महा आरोग्य शिबीरात सर्व रोगांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले.

या शिबीराचे प्रास्ताविक करताना डॉ यशवंत राजेभोसले यांनी या महा आरोग्य शिबीराचे वैशिष्ट्य व पार्श्वभूमी मांडली. गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट च्या निर्मितीपासून आजपर्यंत ची यशस्वी वाटचाल ही भगवान दत्तस्वरूप श्री स्वामी



समर्थ महाराज व परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने चालू आहे. इवलेसे रोप लावियेले द्वारी! त्याचा वेलु गेला गगनावरी! फार्मसी कॉलेज सुरू केले आज बी ए एम एस, नर्सिंग, फिजिओथेरपी इत्यादी शिक्षणाची दारे खुली झाली याचे सर्व श्रेय परमपूज्य गुरुमाऊलींचे आहे म्हणूनच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड कॅन्सर रिसर्च सेंटर हे नाव युनिटला दिले. यानंतर कॅन्सर तज्ञ डॉ. नंदकुमार पाणसे यांनी आपल्या मनोगतातून सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चे सामाजिक उपक्रम व गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट ने आयोजित केलेले महा आरोग्य शिबीर हा स्तुत्य उपक्रम आहे व या शिबीरास शुभेच्छा दिल्या. या शिबीरात सणवार व्रत वैकल्याची मांडणी करण्यात आली होती तसेच विवाह संस्कार स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे मराठवाडा विभाग प्रतिनिधी संदीपभाऊ देशमुख, बीड जिल्हा प्रतिनिधी प्रा डॉ गोविंद साळुंके, अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी विजयराव कडु पाटील, युवा नेते रोहितभैय्या पंडित, बीड, परळी वै , अंबाजोगाई, धारुर, वडवणी, गेवराई, माजलगाव तालुक्यातील तसेच परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व साप्ताहिक, दैनिक केंद्रातील सेवेकरी भाविक, आरोग्यसेवा देण्यासाठी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चे डॉ शेवाळे, डॉ जयेश पाटील, डॉ राघवेंद्र राजेश्वरकर, डॉ महेश काळे, डॉ संभाजी लोंढे डॉ सौ विजया दुलांगे इत्यादी उपस्थित होते. तसेच माजलगाव शहरातील डॉ सुशील लोढा, डॉ प्रवीण वारकरी, डॉ संदीप नाटकर, डॉ अशोक घुबडे, डॉ गोळेकर, डॉ शशील पाचपोर, पत्रकार बांधव, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तसेच श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आरोग्य दुत बीड जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे यांनी केले.

## परळीची सुवर्णकन्या आभा मुंडे इटलीतील पॅरा स्विमिंग वर्ल्ड सिरीज मध्ये करणार भारताचे प्रतिनिधित्व

तभा. वृत्तसेवा



**परळी वैजनाथ** | प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील विद्यावर्धिनी विद्यालयातील इयत्ता नववीत शिकणारी विद्यार्थिनी कु. आभा गणेश मुंडे हिची इटली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पॅरा स्विमिंग वर्ल्ड सिरिज स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा दिनांक ९ ते १५ मार्च दरम्यान इटलीतील लिग्नानो सब्बीयोडोरो येथे होणार असून ती या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

परळी सारख्या छोट्या शहरातून आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणारी आभा ही पहिली शालेय विद्यार्थिनी ठरत असल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्पर्धेत जगभरातील अनेक देशांतील खेळाडू सहभागी झालेले असतात व ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय पॅरा स्विमिंग मालिकेतील महत्त्वाची स्पर्धा मानली जाते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत असल्याबद्दल शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आभा मुंडे हिला शुभेच्छा दिल्या.

दरम्यान श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. एस. एस. कोळगे, उपाध्यक्ष श्री. एस. बी. भिंगोरे, सचिव श्री. पी. जी. ईटके, कोषाध्यक्ष श्री. पी. जे. पैंजणे, संचालक श्री. एम. टी. मुंडे, श्री. आर. पी. वाणी, श्री. बी. ए. चेवले, श्री. यू. एच. मातेकर, श्री. एस. एम. कराड तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर. जी. नीला, श्री. जे. व्ही. सुमठाणे, क्रीडा शिक्षक श्री. विजय मुंडे, श्री. बालासाहेब हंगरगे व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून इटलीत होऊ घातलेल्या या जागतिक स्पर्धेत आभाला सुवर्णपदक मिळवण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी बनवले एलईडी स्क्रीन



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील प्रथम वर्षात शिकणाऱ्या संगणक अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध प्रयोगशाळेत प्रा.निशांत मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली एलईडी स्क्रीन ची निर्मिती केली आहे. एलईडी स्क्रीन तंत्रज्ञानाच्या जलद प्रगतीमुळे विविध उद्योगांमध्ये माहिती वितरण आणि दृश्य अनुभवांसाठी उत्कृष्ट साधने उपलब्ध झाली आहेत. याच तंत्रज्ञानाच्या वापर करून एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध सूचना, अत्याधुनिक माहिती घेता येणार आहे. उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर,जेष्ठ सल्लागार प्रा. एम.एस. लोमटे,रमण सोनवळकर,मेजर एस. पी.कुलकर्णी,प्राचार्य रमण देशपांडे, विभागप्रमुख प्रा.रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट,प्रा.अतुल फड,प्रा.श्याम गडदे प्रा.बप्पासाहेब सोनवणे व पॉलिटेक्निकचे शिक्षक कर्मचारी उपस्थित होते..

## प्राथमिक विद्यालयांमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी लाठीकाठी प्रशिक्षण सुरू

तभा. वृत्तसेवा



**बीड** | प्राथमिक विद्यालयांमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीमती बालिका ताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्री रवींद्र नागरगोजे सरांनी लाठीकाठी प्रशिक्षण सुरू केले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना विविध स्टेप्स शिकवत त्यांनी त्यांचे प्रात्यक्षिक शाळेतील विविध कार्यक्रमात आणि विद्यार्थी वार्षिकोत्सवात सादर केले. शिवजयंतीच्या निमित्ताने आयोजित शासकीय शिवजयंतीच्या कार्यक्रमात देखील उपस्थित मान्यवरांच्या व प्रेक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके करून दाखवले. या उपक्रमाची सर्व शाळा स्तरावरून योग्य अंमलबजावणीसाठी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह मा.श्र.हेमंतजी वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी मा.श्री. चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष मा.श्री. उमेशजी जगताप, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.श्री. सतीशजी कुलकर्णी यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला. या पाठपुराव्या निमित्त महाराष्ट्र सरकारने महिला सशक्ति करण्यासाठी शाळेमध्ये लाठीकाठी आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण सुरू करणार असल्याची घोषणा उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री मा.श्री.चंद्रकांतजी पाटील यांनी केली असून स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या शिरपेच्यात यामुळे मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल सर्व स्तरातून संस्कार केंद्राचे कौतुक करण्यात येत आहे.

## स्वानंद काळे याची सांगली अर्बन शाखा माजलगाव येथे लिपिक पदी निवड



तभा. वृत्तसेवा

**बीड** | बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाचा बीएस्सी तृतीय वर्ष २०२४-२०२५ चा माजी विद्यार्थी चिरंजीव स्वानंद संजय काळे यांची सांगली अर्बन बँक शाखा माजलगाव येथे लिपिक पदी निवड करण्यात आली. कोल्हापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशन मार्फत ही निवड झालेली आहे. याकरिता महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, यांनी सत्कार केला. ते म्हणाले स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून होणारी निवड कौतुकास्पद आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ.सोपान सुरवसे , डॉ सुहास जोशी, स्टाफ सेक्रेटरी प्रा. संजय काळे, श्री अभिजीत पांडव उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व प्राध्यापक यांनी. पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## नगरसेविका नागरगोजेनी घेतली नागरिकांच्या तक्रारींची दखल
## बंद पडलेले बोर केले तात्काळ सुरु

तभा. वृत्तसेवा

**परळी (प्रतिनिधी)** | परळी शहरातील प्रभाग क्रमांक ४ मध्ये काही नविन व दीर्घकाळापासून बंद पडलेले बोरवेल तात्काळ दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत केल्याने प्रभाग चार मधील स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवनिर्वाचित नगरसेविका सौ. मीरा केशव नागरगोजे यांनी नागरिकांच्या मागणीकडे तत्परतेने लक्ष देत आवश्यक कामे हाती घेतली.



पाणीपुरवठा सभापती सौ.जयश्रीताई पापा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील मूलभूत सुविधांवर भर देण्यात येत आहे. स्वच्छता मोहीम, रस्त्यावरील दिवाबत्ती, नाल्यांची साफसफाई यासह नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या पाण्याच्या समस्येवरही तत्काळ उपाययोजना करण्यात आली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, धनगर गल्ली, उखळवेस गल्ली, गवंडी गल्ली तसेच भीमनगर परिसरातील बंद पडलेले बोरवेल दुरुस्त करून त्यावर पाईपलाईन व नळ वाल बसवण्यात आले. त्यामुळे या भागातील नागरिकांना पुन्हा नियमित पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. नगरसेविका सौ. मीरा केशवराव नागरगोजे यांच्या पुढाकारामुळे प्रभागातील पाण्याची समस्या मार्गी लागल्याने स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानले असून भविष्यातही प्रभागाचा विकास अशाच प्रकारे सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## टोकवाडी ग्रामपंचायतकडून माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती देण्यास टाळाटाळ

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | पारदर्शक कारभारासाठी महत्वाचा मानला जाणारा माहितीचा अधिकार कायदा (RTI) टोकवाडी येथील ग्रामपंचायतीत मात्र पायदळी तुडवला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. गावातील काही सजग नागरिकांनी विविध विकासकामे, निधी खर्च व प्रशासकीय निर्णयांबाबत माहितीच्या अधिकारातून माहिती मागितली असता ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी मॅडम यांच्याकडून वेळेत माहिती दिली जात नसल्याची तक्रार संजय श्रीराम मुंडे यांनी दिली.



माहिती अधिकार कायद्यानुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून नागरिकांना माहिती देण्यासाठी वारंवार टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जातोय. त्यामुळे काही नागरिकांना माहिती मिळवण्यासाठी थेट माहिती आयोगाची दारं ठोठावावी लागली.

दरम्यान, अशाच एका प्रकरणात संभाजीनगर येथील विभागीय माहिती आयुक्तांनी ग्रामविकास अधिकारी यांच्यावर १० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. मात्र दंडाची कारवाई होऊनही ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत कोणताही बदल झालेला दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक व्हावा, माहिती अधिकार कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि नागरिकांना वेळेत माहिती मिळावी, अशी मागणी टोकवाडीतील ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

टोकवाडी (ता. परळी) येथील श्री. संजय श्रीराम मुंडे यांनी ग्रामपंचायतीच्या विविध कामकाजासंदर्भात माहिती मिळवण्यासाठी दि. २० जानेवारी २०२६ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता. माहिती अधिकार कायद्यानुसार ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित ग्रामविकास अधिकारी मॅडम यांच्याकडून माहिती देण्यात आली नसल्याचे सांगितले जात आहे.

## माता पालक संघ व विशाखा समिती अंतर्गत कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात नगरपरिषद महिला सफाई कामगार सन्मान सोहळा संपन्न

**अंबड (प्रतिनिधी)** | या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आंबेजोगाई च्या उपाध्यक्षा सौ. ज्योती भाभी ठाकूर ,माता- संघ अध्यक्ष सौ.श्वेता कुलकर्णी ,माजी विद्यार्थी पवन जाधव, विशाखा समिती अध्यक्ष श्रीमती अनुराधाताई भाकरे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर घायतडक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री सुनील कुंभार सर यांनी तर ऋणनिर्देश माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर घायतडक सर यांनी केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारतमाता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील विद्यार्थिनींनी सामूहिक गीत यावेळी सादर केले. शाळेतील शिक्षिका सौ.रेखा देशमुख यांनी 'उंच आकाशी घे भरारी'ही कविता सादर केली.

यावेळी अंबड नगर परिषदेतील महिला सफाई कर्मचारी रूपाली संजय जाधव, प्रिया रवींद्र खरात, प्रतीक्षा महेंद्र खरात, माया मिलिंद बनसोडे ,अश्विनी शांताबाई खरात, रूखमणबाई राधेशाम जाधव, छायाताई महादेव वैद्य यांचा तसेच शाळेतील महिला शिक्षक व शिक्षक कर्मचारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## 'आकांक्षित जिल्हा' योजनेत बीडचा समावेश, स्वाराती रुग्णालयाचा होणार कायापालट

**बीड, 11 मार्च** | मुंबईत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी जाहीर झालेल्या ऐतिहासिक तरतुदींचे जोरदार समर्थन केले. राज्याच्या अर्थसंकल्पात बीड जिल्ह्याचा 'आकांक्षित जिल्हा' योजनेत समावेश करण्यात आल्याने आता शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी केंद्र व राज्य सरकारकडून अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ (स्वाराती) वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने 'मास्टर प्लॅन' मंजूर केला असून, आमदार मुंदडा यांनी यासाठी केलेल्या दीर्घकालीन पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे.

शेतकरी हिताचा विचार करून गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेची व्याप्ती वाढवत त्यात शेतमजुरांचा समावेश करण्याचा निर्णय कौतुकास्पद असल्याचे मुंदडा यांनी नमूद केले. तसेच महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त आगामी वर्ष 'सामाजिक समता वर्ष' म्हणून साजरे करण्याच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. कर्जमाफी आणि नैसर्गिक शेती अभियानामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार असून हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांच्या प्रगतीचा मार्ग सुकर करणारा असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.

## धारूर घाटात भीषण अपघात: ३०० फूट खोल दरीत कोसळला टँकर

**बीड, 11 मार्च** | धारूर घाटातील एका धोकादायक वळणावर भीषण अपघात झाला. हैदराबादहून छत्रपती संभाजीनगरकडे माल घेऊन जाणारा टँकर सुमारे ३०० फूट खोल दरीत कोसळला. टँकरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात घडला. दरीत कोसळताच टँकरने पेट घेतला आणि आगीच्या ज्वाळा उसळल्या. मात्र चालक महादेव बिक्कड यांनी प्रसंगावधान राखत टँकरमधून उडी मारल्याने मोठा अनर्थ टळला. किरकोळ जखमी झालेल्या चालकावर सध्या केज येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. या घाटात गेल्या वर्षभरातील ही सहावी मोठी दुर्घटना असून वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे धारूर घाट आता मृत्यूचा सापळा बनत आहे. प्रशासनाने घाटाचे रुंदीकरण आणि सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी आता जोर धरत आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात HPV लसीकरण मोहिमेची सुरुवात

### १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींनी लाभ घ्यावा – डॉ. शंकर धपाटे

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | आज दिनांक ९ मार्च २०२६ रोजी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मोहिमेचा राष्ट्रीय स्तरावर शुभारंभ करण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसेच आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.

त्या अनुषंगाने दि. ९ मार्च २०२६ पासून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागातील ओपीडी क्रमांक



२० येथे या लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शंकर धपाटे यांनी सांगितले की, एचपीव्ही लस ही प्रामुख्याने गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी दिली जाते. वय वर्षे १४ पेक्षा जास्त व १५ वर्षांखालील मुलींनी या लसीचा लाभ घ्यावा. ही लसीकरण मोहीम पुढील तीन महिने सुरु राहणार असून पालकांनी आपल्या मुलींना लसीकरणासाठी आणावे, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. राकेश जाधव, जनऔषध वैद्यकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर.सी. संबुटवाड, डॉ. विनोद वेदपाठक, सहयोगी प्राध्यापक डॉ. दिपाली देव, सहाय्यक प्राध्यापक डॉ. योगेश माने, डॉ. योगेश गालफाडे, डॉ. प्रमोद तोटावाड, वरिष्ठ निवासी डॉ. शेरॉन मुरमो, पदव्युत्तर विद्यार्थी सारिका पुरणवाड, इनचार्ज सिस्टर तसेच समाजसेवा अधीक्षक श्री. आशोक वाघोळे, आरोग्य शिक्षक श्री. संजय जाधव, परिचारिका, आंतरवासिता विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची उपस्थिती होती.

ओपीडी क्रमांक २० येथे एचपीव्ही लस दररोज सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत उपलब्ध असून १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाने केले आहे.

## परळी मतदारसंघातील रस्ते विकासासाठी २५ कोटींचा निधी मंजूर

**बीड, 11 मार्च** | परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील विविध महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणेसाठी आणि दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत २५ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर झाला आहे. राज्याचे माजी मंत्री आणि स्थानिक आमदार धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्यामुळे महायुती सरकारने या विकासकामांना हिरवा कंदील दाखवला असून, यामुळे परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. या निधीतून प्रामुख्याने दाबी-इंदपवाडी, जोगाईवाडी-राडी, नाश्रा-इंजेगाव आणि जिवनापूर-गोवर्धन यांसारख्या प्रमुख मार्गांचे काम पूर्ण केले जाणार आहे. यात रस्ते सुधारणांसोबतच काही ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते आणि नाली बांधकामांचाही समावेश आहे. मतदारसंघातील रस्ते अधिक दर्जेदार व्हावेत या उद्देशाने हा निधी खर्च केला जाणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे जाहीर आभार मानले असून, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित होते.




## कानेगाव जि.प. शाळेत महिला दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ मार्च -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा विद्या वाल्मिक पतंगे यांनी मुलींच्या भौतिक सुविधांसाठी १० हजार रुपयांची देणगी दिली.



कार्यक्रमाची सुरुवात विद्या पतंगे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व माता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या पतंगे होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून माधुरी कांबळे, नसरीन तांबोळी, मंगल बन, पूजा पाटील तसेच स्थानिक महिला पालक उपस्थित होत्या.

या प्रसंगी मुख्याध्यापक बालाजी साळुंके, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दादासाहेब कदम, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## भरधाव कार चहाच्या स्टॉलमध्ये घुसली; उमरग्यात भीषण अपघातात दोघांचा मृत्यु

### एक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ मार्च -**

शहराजवळील सोलापूर-हैदराबाद महामार्गावर मंगळवारी (दि. १०) दुपारी भीषण अपघात घडला. भरधाव वेगात असलेल्या एस-क्रॉस कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कार रस्त्यालगत असलेल्या चहाच्या स्टॉलमध्ये घुसली. या दुर्घटनेत उमरगा येथील माजी नगरसेवक बळीराम पवार आणि जनता अर्थमूव्हर्सचे मालक लाडनशहा मुर्शद यांचा जागीच मृत्यू झाला, तर मॅकेनिक सचिन कुठार हे गंभीर जखमी झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा राज्यातील एक कुटुंब तुळजापूर येथे तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन हैदराबादकडे परत जात होते. उमरगा चौकाजवळ भारत टायर परिसरात कार (क्रमांक टीएस ३४ एफ ४७०६) भरधाव वेगात जात असताना अचानक टायर फुटल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. नियंत्रण सुटलेली कार थेट महामार्गाच्या कडेला असलेल्या पत्र्याच्या चहाच्या हॉटेलमध्ये घुसली. अपघात इतका भीषण होता की हॉटेलमध्ये चहा घेत बसलेल्या बळीराम पवार आणि लाडनशहा मुर्शद यांना जोराची धडक बसली आणि दोघांचाही जागीच मृत्यू झाला. तर सचिन कुठार हे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून मोठ्या प्रमाणात नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना रुग्णालयात हलवले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

भीषण अपघातात दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यामुळे शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## तुळजापूरमध्ये १७ वर्षीय तरुणाचे अपहरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मार्च -**

तुळजापूर शहरातील एस.टी. कॉलनी परिसरातील १७ वर्षीय



तरुणाला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी संतोष दत्तात्रय जोशी (वय ५५, रा. एस.टी. कॉलनी तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांचा मुलगा समर्थ संतोष जोशी (वय १७) यास दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवून नेले.

या घटनेबाबत संतोष जोशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. यामुळे शहरात एकच खळबळ उडली आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापूरमध्ये गड-किल्ल्यांच्या जतनासाठी आमरण उपोषण

**तुळजापूर, दि.११ मार्च -**

तुळजापूर - छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या जतन व संवर्धनासाठी राज्यात स्वतंत्र गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी तुळजापूर येथे सामाजिक कार्यकर्ते किसन चव्हाण पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला विविध शिवप्रेमी संघटनांसह नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून दररोज शेकडो गडप्रेमी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवत आहेत. तुळजापूर शहरात सुरू असलेल्या या उपोषणाची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. यावेळी पक्षाच्या वतीने पाठिंब्याचे पत्रही देण्यात आले. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील, तुळजापूर तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



### न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलमध्ये जागतिक महिला दिन साजरा

**लोहारा, दि.११ मार्च -**

लोहारा येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलमध्ये ८ मार्चचे औचित्य साधून जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका सविता जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून जयअंबिका प्राथमिक आश्रमशाळा, एकंबी तांडा (ता. औसा) येथील शिक्षक दिलीप पटणे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य शहाजी जाधव यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते भारतमाता, सरस्वती माता, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्राचार्य जाधव यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगितले, तर दिलीप पटणे यांनी महिलांच्या विविध क्षेत्रातील कर्तृत्वावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीरा माने यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना सोनके यांनी केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



### उमरा जि.प. शाळेत महिला दिन साजरा

**येरमाळा, दि.११ मार्च -**

कळंब तालुक्यातील उमरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे डॉ. संदीप तांबारे व शालेय व्यवस्थापन समितीच्या स्वाती जाधव यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. संदीप तांबारे यांनी महिला सन्मान, स्त्रीशक्ती व शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. शिक्षिका आरती कवडे यांनी महिलांचे समाजातील योगदान व स्त्री सक्षमीकरणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास मुख्याध्यापक रणजीत चौधरी, महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

### वैजिनाथ माशाळकर यांचे निधन

**उमरगा, दि.११ मार्च -**



शहरातील वैजिनाथ माशाळकर (वय ८७) यांचे सोमवारी (दि.९) रात्री ११.५० वाजता उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि.१०) दुपारी लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. माजी नगरसेवक महेश माशाळकर यांचे ते वडील होत.

## न.पा. सभागृहात इनकॅमेरा रेकॉर्डिंग करा; पत्रकारांसाठी बसण्याची व्यवस्था करा

### काँग्रेस आयची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मार्च -**

नळदुर्ग नगरपालिका सभागृहात होणाऱ्या मासिक सर्वसाधारण सभेचे इनकॅमेरा रेकॉर्डिंग करण्यात यावे तसेच नियमानुसार पत्रकारांना सभागृहात बसण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी काँग्रेसच्या नगरसेवकांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, नगरपालिका मासिक सर्वसाधारण सभेचे सभागृहात इनकॅमेरा रेकॉर्डिंग करण्यात यावे. सभागृहात नगरपरिषद सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांचा काहीवेळा विपर्यास होत असल्याने त्यातून सदस्यांची बदनामी होण्याची शक्यता निर्माण होते. ही बाब टाळण्यासाठी सभागृहात कॅमेरे बसवून रेकॉर्ड नोंद ठेवण्यात यावी.

तसेच नळदुर्ग शहरातील पत्रकारांना सभेच्या वेळी शक्य असल्यास नियमानुसार सभागृहात बसण्याची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या पत्रानुसार मागील झालेल्या नगरपालिका सर्वसाधारण सभेच्या प्रोसेडींग नोंद रजिस्टरची सत्यप्रत देण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मासिक सर्वसाधारण सभा सुरू झाल्यानंतर सभेचे इतिवृत्त कच्चे किंवा पक्के लिहिले जात असताना दोन्ही गटनेत्यांच्या स्वाक्षऱ्या तात्काळ घेण्यात याव्यात, जेणेकरून सभागृहात सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांमध्ये कोणताही बदल होणार नाही. सदस्यांनी व्यक्त केलेले मत जसेच्या तसे नोंदविण्यात यावे. तसेच सभागृहात सदस्यांना बोलण्यासाठी माईकची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या निवेदनावर काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, नगरसेवक आकाश कुलकर्णी, इमाम शेख, सुधीर पोतदार तसेच नगरसेविका कमलबाई गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित जमिनींना योग्य मोबदला द्या : मोटे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील परंडा मतदारसंघातून जाणाऱ्या सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनींना योग्य मोबदला देण्यात यावा, अशी मागणी माजी आमदार राहुल मोटे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी दि.१० मार्च रोजी धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.



सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग हा परंडा मतदारसंघातील कुंभेफळ, कांदलगाव, पिस्तमववाडी, राजुरी, घारगाव, सिरसाव, रोहकल, अनाळा तसेच इतर अनेक गावांमधून जाणार आहे. या महामार्गासाठी प्रशासनाकडून संबंधित गावांतील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी संपादित करण्यात आल्या आहेत.

मात्र या जमिनींसाठी जाहीर करण्यात आलेला मोबदला अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जमीन ही शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार असल्याने जमीन संपादित झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबांवर मोठा आर्थिक व सामाजिक परिणाम झाला आहे.

त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना समृद्धी महामार्गासाठी देण्यात आलेल्या मोबदल्याप्रमाणेच योग्य व समाधानकारक मोबदला देण्यात यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये आणि त्यांना न्याय मिळावा यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही राहुल मोटे यांनी केली आहे.

## स्वआधार बालगृहात महिला दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मार्च -**

तुळजाई प्रतिष्ठान संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह (विमानतळ रोड, आळणी) येथे दि.९ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुनीता गुंजाळ-कवडे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून लता हंगे, कृषी अधिकारी सोनाली मुंडे, उपविभागीय वन अधिकारी सुदाम मुंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी वैजिनाथ कुटे, मनोज सुरवसे व रूपाली सुरवसे उपस्थित होते.

बालगृहातील मुलींनी मान्यवरांचे शाल व बुके देऊन स्वागत केले.

सचिव शहाजी चव्हाण यांनी बालगृहातील महिला कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव केला. यावेळी स्पेशल ऑलिंपिक भारत क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवलेल्या मुलींचा सत्कार करण्यात आला.

तसेच दिव्यांग असूनही जिद्दीच्या जोरावर महसूल सहाय्यक पद मिळवलेल्या अनुजा नितळीकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. जागृती फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने मुलींना सॅनेटरी पॅडचे वाटप करण्यात आले, तर शौर्य सुदाम मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुलींना कपड्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी महिला सक्षमीकरण व समाजातील महिलांची भूमिका यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक गुरुनाथ थोडसरे यांनी केले.

## वाहतूक नियमभंगावर कारवाई; दंड वसूल

**धाराशिव, दि.११ मार्च -**

शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून कारवाई करण्यात आली.

दि.९ मार्च रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायद्याचे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर एकूण ८५ कारवाया करण्यात आल्या.

## आरळी येथे महाराष्ट्र केसरी २०२६ साठी धाराशिव जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ मार्च -**

भारतीय माती शैली कुस्ती विभाग आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२६ साठी धाराशिव जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धा रविवार, दि.८ रोजी तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील श्रीमंत कुस्ती आखाडा येथे उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेत विविध वजन गटांमध्ये पैलवानांनी दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. त्यामध्ये ५५ किलो गटात पैलवान ओंकार नरवटे (उमरगा), ६० किलो गटात पैलवान वैभव भोसले (तुळजापूर), ६५ किलो गटात पैलवान रोहित जाधव (परांडा), ७० किलो गटात पैलवान तुषार खामकर (भूम), ७५ किलो गटात पैलवान सुरज गवळी (धाराशिव), ८० किलो गटात पैलवान पृथ्वीराज तुगावे (तुळजापूर), ८५ किलो गटात पैलवान ज्ञानेश्वर हारवले (धाराशिव) आणि ९० किलो गटात पैलवान किरण काळदाते (परांडा) यांनी आपापल्या गटात विजय मिळवला. महाराष्ट्र केसरीसाठी खुल्या गटातून राहुल मुळे (तुळजापूर) आणि गणेश कारंडे (परांडा) या दोन पैलवानांची निवड करण्यात आली. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जिल्हा तालीम संघ सचिव वामन गाते, राष्ट्रीय कुस्ती पंच धनराज भुजबळ, उपमहाराष्ट्र केसरी मारुती आप्पा विठ्ठलकर, लोहारा तालीम संघ अध्यक्ष दयानंद साळुंखे, अक्कलकोट तालीम संघ अध्यक्ष महेश कुलकर्णी, कुस्ती कोच गोविंद घारगे तसेच एनआयएस कुस्ती कोच आरिफ देशमुख यांनी सहकार्य केले.

या स्पर्धेला दर्याप्पा मुळे, वस्ताद अरुण हावळे, अमोल पाटोळे, बाबुराव मुळजे, विजय धोंगडे, माहेश्वर भोसले, नारायण पौळ, शिवानंद गवळी, पापालाल शेख, कालीदास माने, कालीदास पारवे, अजीत भोसले, सचिन पारवे, किरण गायकवाड आणि सिद्धराम तानवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## श्री राजगुरु गुरुकुल विद्यालयाच्या इमारतीचा कोनशीला समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मार्च -**

नळदुर्ग येथील राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठाचे मठाधीपती व श्री राजगुरू शिवलिंगेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांच्या संकल्पनेतून नळदुर्ग येथे सीबीएसई पॅटर्नवरील श्री राजगुरू गुरुकुल विद्यालय सुरू करण्यात येत असून या विद्यालयाच्या भव्य इमारतीचा कोनशीला समारंभ ७ मार्च रोजी पार पडला.

तुळजापूर तालुक्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते हा समारंभ पार पडला. कार्यक्रमास नंदगाव येथील विरक्त मठाचे राजशेखर महास्वामीजी, अमीनगडचे शंकर राजेंद्र महास्वामीजी, मुन्नावळी येथील मुरगेंद्र महास्वामीजी तसेच अणदूर मठाचे शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसवराज शिवाचार्य महास्वामीजी होते. यावेळी भाजपचे सुनील चव्हाण, नितीन काळे, नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जहागीरदार, नगरपालिकेतील भाजप गटनेते दत्तात्रय दासकर, काँग्रेस गटनेते मारुती खारवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले तर सूत्रसंचालन दत्तात्रय कोरे यांनी केले. कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

## उपमुख्यमंत्री शिंदे यांची चव्हाण यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ मार्च -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा जि.प. गटाचे नवनिर्वाचित सदस्य विकी चव्हाण यांनी दि.९ मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी चव्हाण यांचे जिल्हा परिषद सदस्यपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच तेरखेडा जिल्हा परिषद गटाच्या विकासासंदर्भात रस्ते, पाणीपुरवठा व इतर मूलभूत सुविधांबाबत दोघांमध्ये चर्चा झाली.

# माहूरमध्ये ५०० च्या बनावट नोटा जप्त

## उर्स यात्रोत्सवात बनावट नोटा चालविण्याचा प्रयत्न फसला!

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ११ मार्च-**
शहरातील सोनापिर बाबा दर्गाह येथे सुरू असलेल्या उर्स यात्रेदरम्यान एका विधी संघर्षित बालकाकडून बनावट नोटा चालविण्याचा प्रयत्न उघडकीस आला असून, माहूर पोलिसांनी केलेल्या कारवाईत ५०० च्या एकूण १९ हजार ५०० रुपयांच्या ३९ बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी एका व्यक्तीस ताब्यात घेत गुन्हा दाखल केला असून एका विधि संघर्षित अल्पवयीन मुलाचा सहभाग समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, दि. १० मार्च रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास माहूर पोलीस स्टेशनचे पोकॉ संग्राम पवार, पोकॉ गजानन जाधव व पोकॉ राठोड हे सोनापिर बाबा दर्गाह येथे सुरू असलेल्या उर्स यात्रेत पायी पेट्रोलिंग करत होते.यावेळी क्रॉस झुल्याजवळील तिकीट काऊंटरवरील महिलेने एका मुलाकडून बनावट नोट देऊन तिकीट घेत असल्याची माहिती पोलिसांना दिली.

यावरून पोलिसांनी तात्काळ त्या मुलास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने माहूरच्या वार्ड क्र. ७ येथील रहिवासी असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून ५०० रुपयांच्या ६ बनावट भारतीय चलनी नोटा, एकूण ३ हजार रुपये मिळून आले.

पुढील चौकशीत या नोटा त्याने जिथून आणल्या त्या घराची माहिती त्याने पोलिसांना दिली. त्यानुसार वरिष्ठांच्या आदेशावरून पोलिसांनी पंचांसमक्ष सदरील घराची झडती घेतली. यावेळी घरातील रॅकमधील कपड्याखाली ५०० रुपयांच्या आणखी ३३ बनावट नोटा, एकूण १६ हजार ५०० रुपये किंमतीच्या आढळून आल्या.पोलिसांनी पंचनामा करून सर्व बनावट नोटा जप्त केल्या असून एकूण ५०० च्या ३९ बनावट नोटा असे मिळून १९,५०० रुपये हस्तगत करण्यात आले आहे.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी शरद घोडके हे पोहेकॉ लक्ष्मण मेश्राम, पोकॉ संग्राम पवार, पोकॉ संघरत्न सोनसाळे, होमगार्ड शेख गणी, दिलीप जाधव, पंकज मुरकुटे, उमेश भगत, एस.पी. भगत यांच्या मदतीने करत आहेत.

# टेंभूर्णीतील मदर शहावली यात्रेत किरकोळ वादातून तरुणाचा खून

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ११ मार्च-**
नायगांव तालुक्यातील टेंभूर्णी येथे सुरू असलेल्या मदर शहावली यात्रेदरम्यान किरकोळ वादातून एका तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे टेंभूर्णी गावासह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

टेंभूर्णी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. ९ मार्चपासून मदर शहावली देवस्थान येथे यात्रा महोत्सवाची मोठ्या उत्साहात सुरुवात झाली होती. पंचक्रोशीतील गावांमधून आलेले नागरिक, अबाल वृद्ध व तरुण मंडळी मोठ्या भक्तिभावाने यात्रेत सहभागी झाली होती.

यात्रेदरम्यान दि. १० मार्च रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास टेंभूर्णी येथील सतीश वडजे वय २९ हा मदरशहावली दर्ग्याकडे गेला होता. मात्र तो रात्री उशिरापर्यंत घरी परतला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी कुटुंबीयांनी मदर शहावली देवस्थान परिसरात शोध घेत असताना सतीश वडजे याचा मृतदेह नाल्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आला. ही घटना समजताच गावात एकच खळबळ उडाली.

याबाबत टेंभूर्णी येथील शेतकरी किशनराव पांडुरंग वडजे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, भावकीतील दोन भावांमधील आपापसा तील किरकोळ वादातून सतीश वडजे याचा खून झाल्याची प्राथमिक माहिती समोर आलीआहे.या प्रकरणी नायगांवपोलीस ठाण्यात दोन भावांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.या दुर्दैवी घटनेमुळे टेंभूर्णी गावात शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## देगलूरमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त युवासेनेच्या वतीने महिलांचा गौरव

**देगलूर** -जागतिक महिला दिनानिमित्त युवा सेनेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांसह आरोग्य सेवेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या आशा वर्करांचा रविवारी (दि. ८ मार्च) येथील उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी शिंदे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर, युवा सेना तालुकाप्रमुख नामदेव पाटील देगावकर, अँड. अंकुशराजे जाधव, डॉ. मिलिंद शिकारे, मनोहर देगावकर ,आनंद राजुरे, बजरंग कोसंबे ,सुनील शिंदे, सुनील थडके, मिलिंद काळगावकर , प्रकाश पाटील वसुर, अंकुश पाटील, शिवकुमार शिवपुजे, संतोष वाघमारे यांची उपस्थिती होती. शहरातील १२ वार्डमधील एकूण २६ आशा वर्कर तसेच शासकीय रुग्णालयातील सिस्टर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी निरूपमा ताई असपतवार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी व्यंकटराव पाटील खतगावकर, डॉ. दीक्षित मॅडम व डॉ. मिलिंद शिकारे यांनी मनोगत व्यक्त करत आरोग्य क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे सांगितले. तसेच राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व माता रमाई आंबेडकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महिलांना सन्मान देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे आयोजक तथा युवा सेना तालुकाप्रमुख नामदेव पाटील देगावकर यांनी सांगितले आहे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. अंकुशराजे जाधव यांनी केले. तर आभार मिलिंद काळगावकर यांनी मानले

## मुदखेड येथील केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**मुदखेड** -केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ८७ व्या स्थापना दिनानिमित्त देशभरात आयोजित विविध सामाजिक आणि सार्वजनिक कल्याणकारी कार्यक्रमांचा एक भाग म्हणून, आज, ९ मार्च २०२६ रोजी केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालय, सीआरपीएफ, मुदखेड, नांदेड येथे आरोग्य शिबिर आणि रक्तदान



शिबिराचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अधिकारी आणि जवानांनी रक्तदान शिबिरात उत्साहाने सहभाग घेतला. एकूण ८२ कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाज आणि मानवतेप्रती आपली जबाबदारी, सेवा आणि समर्पण दाखवले. नांदेड येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, जिथे डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या पथकाने शिबिर यशस्वीरित्या पार पाडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन आर.गोपाळ कृष्ण राव, प्राचार्य, सीटीसी, सीआरपीएफ, मुदखेड यांनी केले. याप्रसंगी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रक्तदान हे मानवी सेवेचे सर्वोच्च रूप आहे, जे गरजू व्यक्तीला नवीन जीवन देण्यास सक्षम आहे. त्यांनी या उदात्त कार्यात दलाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उत्साही सहभागाचे कौतुक केले आणि सांगितले की, सीआरपीएफने नेहमीच देशाच्या अंतर्गत सुरक्षेतच नव्हे तर समाजाप्रती असलेल्या मानवतावादी जबाबदाऱ्या पार पाडण्यातही आघाडीची भूमिका बजावली आहे. त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना भविष्यात अशा सार्वजनिक कल्याण आणि मानवतावादी कार्यात सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. व्ही.पी. त्रिपाठी, कमांडंट चीफ ट्रेनिंग ऑफिसर, सीटीसी, सीआरपीएफ, मुदखेड, यांच्यासह इतर अधिकारी आणि कर्मचारी देखील यावेळी उपस्थित होते. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक सहकार्याने आयोजित केलेले रक्तदान शिबिर यशस्वी झाले, जे राष्ट्र आणि समाजाची सेवा करण्याच्या सीआरपीएफच्या वचनबद्धतेला पुन्हा अधोरेखित करते.

## खरब खंडगांवच्या सतिश कदमची बँक असिस्टंट पदी निवड

**आदमपूर** -मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगांव येथील नागरिक संतोष पाटील यांचा मुलगा होतकरू तरूण सतिश उर्फ बंटी संतोष कदम याची बँक ऑफ इंडिया मध्ये असिस्टंट पदी गुणवत्तेवर निवड झाली.गावी परतल्यावर महादेव मंदिर ते त्यांच्या निवासस्थानापर्यंत



गावकरी व मित्र परिवारासह भव्य मिरवणूक काढण्यात आली. आपल्या अथक प्रयत्नांची पराकाष्ठा करीत त्याने हे यश मिळवून स्पर्धेतील विद्यार्थ्यांना प्रेरित केले आहे. जिद्द,चिकाटीने काहीतरी वेगळे करून दाखविण्याची इच्छा यशस्वी निकालात परिवर्तीत झाली!आई वडिलांच्या कष्टांचे चीज झाल्याची भावना गावात स्वागत सत्कार सोहळ्यात त्याने व्यक्त केली. सदरील कार्यक्रमास विद्यमान सरपंच डॉ.रणजित काळेवार,माजी सरपंच व्यंकट एकाळे,महाराष्ट्र ग्रामीण बँक सहाय्यक महमदरफी मदार, संतोष कदम,शेख माजीत, शेख शब्बीर,भगवान जाधव, हाणमंत कदम, नागनाथ एकाळे,होमगार्ड शिपाई शंकर कदम,किसन एकाळे, व्यंकटराव कदम, नागनाथ गंगाधर एकाळे,शंकर बापूराव कदम,नामदेव कदम,कदम परिवार व गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत आजी माजी पदाधिकारी आदिंची उल्लेखनीय उपस्थिती होती.

# स्वारातीम विद्यापीठात महिला दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ मार्च-**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी नांदेड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व अभ्यासान केंद्राच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला दिन सप्ताह साजरा करण्यात येत आहे.हा कार्यक्रम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून या कार्यक्रमात महिला व्याख्या महिलांच्या विविध प्रश्नावर मार्गदर्शन दिनांक ९ मार्च ते १४ मार्च पर्यंत विविध संकुलात आयोजन करण्यात आले आहे.

स्वारातीम विद्यापीठ नांदेड येथे ८ मार्च महिला दिनानिमित्त दिनांक ९ मार्च ते १४ मार्च २०२६ दरम्यान महिला दिन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. हा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या समन्वयिका डॉ. सुनिता पाटील यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्याचे आयोजिले आहे. या महिला दिन सप्ताहामध्ये दिनांक १० मार्च रोजी महिलांच्या आर्थिक ,सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व शारीरिक यासंबंधी मार्गदर्शन करताना डॉ. करुणा जमदाडे यांनी महिलांच्या समानता व सक्षमीकरण आणि त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली तर त्याचबरोबर समाजात वावरताना दोन्ही कुटुंब जोडून कशी ठेवता येईल याची पण महिलांनी काळजी घेतली पाहिजे्. याचवेळी महिलांना मार्गदर्शन करताना डॉ. मनीषा मुंडे यांनी महिलांनी चुल आणि मुल व बाहेर नोकरी, कर्तव्य बजावत असताना आपल्या स्वतःची काळजी कशी घेतली पाहिजे याविषयी आपण कधी जेवले पाहिजे जेवताना काय खाल्ले पाहिजे जेणेकरून करून आपले शरीराने आपल्याला साथ दिली पाहिजे स्वतःसाठी नाही तर कुटुंबीयांसाठी आपणास उभे राहाता आले पाहिजे आरोग्याच्या दृष्टीने सशक्त राहण्यासाठी आपण इतरा बरोबरच स्वतःची काळजी घेतली पाहिजे असे मत डॉ मनीषा मुंडे यांनी मांडले त्यानंतर व्यासपीठावरून डॉ.पुष्पा गायकवाड यांनी आपल्या महिलांच्या जीवनातील अनेक प्रश्नावर मार्गदर्शन केले. मुलींनी आपले ध्येय समोर ठेवून शिक्षण घ्यावेत आपण आपले घर सोडून दूर शिक्षणासाठी येतो आणि तेथे आल्यावर आपण शिक्षणावर लक्ष देऊन शिक्षण पूर्ण करून आपले स्वप्न साकार करण्याची जिद्द ठेवावी. इतर गोष्टी जीवनात कधीही मिळतील पण आपल्याला एखादा अधिकारी बनण्याची संधी पुन्हा पुन्हा मिळत नाही. यासाठी खूप कष्ट सहन करावे लागतील. असे मत मांडले या सर्व गोष्टी करिता आपण स्वतःच्या खानपानाची ही काळजी घेतली पाहिजे असे सांगितले. सदरील महिला दिन सप्ताहात डॉ. भावना भगत, डॉ. मीनल गायकवाड, डॉ. उज्वला सदावर्ते, डॉ. पैठणी, सुरेखा रावणगावकर, जयश्री पावडे, तेजस्विनी सोनटक्के, वैजयंती रामनाथन, वर्षा मोरे, निराली कलकापुरे, मनीषा वाघमारे वरील सर्व वक्ते महिला दिनानिमित्त दिनांक १४ मार्च परत मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनिता पाटील यांनी केले तर आभार डॉ. सिंकू सिंह कुमार यांनी मानले तेव्हा यावेळी प्रस्तुत विद्यापीठातील संगणक संकुलाचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्मार्टमीटर संबंधाने नागरिकांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करा : नगराध्यक्षा सुजाता एंड्रलवार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ११ मार्च-**
शहरात महावितरणमार्फत बसविण्यात येत असलेल्या नवीन स्मार्ट वीज मीटरबाबत नागरिकांच्या तक्रारींत मोठी वाढ झाली असून, या समस्यांचे तातडीने निराकरण करण्यात यावे, अशी मागणी किनवट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता एंड्रलवार यांनी विद्युत कार्यालयाच्या उपविभागीय अभियंत्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

शहरात सध्या जुने वीज मीटर बदलून नवीन डिजिटल मीटर लावण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, हे नवीन मीटर लावल्यापासून अनेक वीज ग्राहकांना अव्वाच्या सव्वा बिले येत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षांनी नागरिकांच्या हितासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे.

नवीन मीटर बसवल्यानंतर अचानक वीज बिलात दुपटीने वाढ झाल्याचे नागरिकांचे



म्हणणे आहे.

नवीन मीटर अत्यंत वेगाने फिरत असल्यामुळे सामान्य कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. स्मार्ट मीटरची कार्यपद्धती बिलिंग पद्धत व तांत्रिक माहितीबाबत कोणती स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही

शहरातील जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. महावितरणने नवीन मीटरची पारदर्शकता तपासावी आणि ज्या ग्राहकांना वाढीव बिले आली आहेत, त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करावे अशा मागण्या सौ. सुजाता एंड्रलवार यांनी निवेदनात केल्या आहेत.जर महावितरणने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. नवीन मीटरची तपासणी करून व ती अचूक असल्याची खात्री करूनच बसवण्यात यावीत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

या निवेदनामुळे आता महावितरण प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण किनवटवासीयांचे लक्ष लागले आहे. याप्रसंगी शिवसेना उबाठा पक्षाचे शहर प्रमुख प्रशांत कोरडे नगर परिषदेचे बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानीवार,अन्वर मिर्झा, निसार भाटी राजू सातूरवार हे उपस्थित होते.

## दारू विक्रेत्याच्या बोटलांची तोडफोड

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ११ मार्च-**
तालुक्यातील आंदेगाव पूर्व येथे अवैध देशी दारू विक्रीमुळे गावातील तरुणाई व्यसनाधीन होत असल्याने संतापलेल्या ग्रामस्थांनी आणि नव तरुण युवकांसह महिलांनी आक्रमक पवित्रा घेत, अवैध दारू अड्डे उद्ध्वस्त केले आहेत तालुक्यातील बऱ्याच ठिकाणी व अनेक ग्रामीण भागात ग्रामसभेत ठोस ठराव मंजूर करून देखील तालुक्यातील अवैध दारू विक्री बंद करण्याचे आवाहन प्रशासनाला करण्यात आले. तरी पण ही अवैध दारू बंद होत नसल्यामुळे आज चक्क आंदेगाव येथे दहा मार्च रोजी संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी अवैध देशी दारू विक्री करणाऱ्याच्या घरावर धाड टाकून त्यांच्या घरातील दारूच्या बाटल्यां बाहेर काढून तोड फोड करून संबंधित पोलीस प्रशासनाला बोलावत त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली.

# धार्मिक व संस्कृत शिक्षणासाठी श्री दुर्गा पाठशाळेची नवी इमारत उभारणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ मार्च-**
श्री दुर्गा पाठशाळा, नांदेड यांच्या वतीने नव्या पाठशाळा इमारतीच्या बांधकामासाठी भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार दि. १४ मार्च रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत श्रीदुर्गा नगर, मालेगाव रोड, नांदेड येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे भूमिपूजन स्वामी श्री गोविंददेवगिरी जी महाराज यांच्या शुभहस्ते होणार असून भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्री दुर्गा पाठशाळेने गेल्या अनेक वर्षांत धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. संस्थेच्या गुरुकुल विभागातून २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी वेद, शास्त्र, संस्कृत व प्राण या विषयांमध्ये सर्वोच्च पदवी प्राप्त करून समाजसेवेचे कार्य सुरू केले आहे. तसेच संस्थेच्या संस्कृत विभागातून १५०० पेक्षा अधिक शालेय विद्यार्थ्यांना संस्कृत आणि श्रीम्द्भगवद्गीतेचे शिक्षण देण्यात आले आहे.

संस्थेकडे विविध विषयांवरील ५०० हून अधिक पुस्तकांचे समृद्ध ग्रंथालय असून गेल्या ३१ वर्षांपासून प्राच्यविद्या महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. पाठशाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त अध्यापक व विद्यार्थ्यांनी २५ गावांमध्ये २५ भागवत सप्ताह आणि २५ विष्णुसहस्रनाम स्वाहाकार यशस्वीरीत्या पार पाडले आहेत.

सध्या पाठशाळेत १२ व्द्यिार्थी सामवेद, ऋग्वेद, स्मार्त, संस्कृत, प्राण व वेदांत शास्त्र या विषयांचे अध्ययन करीत आहेत. तसेच 'हिंदुत्व दर्शन' या भव्य प्रकल्पावर काम सुरु असून आतापर्यंत ४ लाख २५ हजार श्लोकांचे परीक्षण पूर्ण करण्यात आले आहे. गुरुकुलातील अध्यापक व विद्यार्थ्यांनी सामवेद राणायनी शाखेच्या १०८ पारायणांचा संकल्प केला असून त्याची संकल्पपूर्ती १२ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

याशिवाय भविष्यात धर्मदर्शन, साधना केंद्र, राष्ट्रदर्शन आणि प्रज्ञा जागृती अशा विविध उपक्रमांचीही योजना संस्थेच्या वतीने अध्यक्ष पं राजेश्वर देशमुख व सचिव पं रेणुकादास पळसकर यांच्याकडून करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ब्रँड अँबेसिडर राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांनी घेतली भेट

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ११ मार्च-**
महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्र राज्याचे स्वच्छता दूत माहूर गडावरील श्री आनंद दत्तधाम आश्रमाचे मठाधीश, राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांनी मंत्रालय, मुंबई येथे भेट घेत स्वच्छतेबाबत केलेल्या कार्याचा कार्यअहवाल सादर केला.

या भेटीदरम्यान महाराष्ट्रभर राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता जनजागृती, राज्यातील



आयटीआय प्रशिक्षण संस्थांमध्ये होत असलेल्या प्रशिक्षण जनजागरण स्वच्छता, गिरनार पर्वतावर होणाऱ्या सप्ताह स्वच्छता अभियानाची तसेच सामाजिक उपक्रमांबाबत सविस्तर माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आली. विशेष म्हणजे यावेळी भगवान श्री दत्त प्रभूंची प्रतीमा व स्वच्छतेचे प्रतीक म्हणून झाडू मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

राज्यात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता मोहिमेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त करत तंबाखू मुक्ती, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, वृक्ष लावगड, व्यसन दहन कार्यक्रम, शालेय शिक्षण अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, वह्या,पेन,पुस्तके वाटप यासह राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.यावेळी महाराष्ट्र राज्याच्या स्वच्छता व ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यासह राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांचे सोबत निजशिष्य प्रल्हाद देवडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# जुगार अड्ड्यावर तामसा पोलिसांची धाड; ५ लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. ११ मार्च-**
तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांनी अचानक धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम व मोटारसायकलींसह एकूण ५ लाख ६३ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे व इतर जणांनी पळ काढला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.४० वाजण्याच्या सुमारास तामसा तांडा शिवारात काही इसम अवैधरित्या जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती तामसा पोलिसांना मिळाली. ही माहिती मिळताच तामसा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शाहदेव खेडकर यांनी तातडीने पथक तयार करून संबंधित ठिकाणी धाड टाकण्याचे आदेश दिले. यानुसार सहायक पोलीस निरीक्षक शाहदेव खेडकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार बालाजी नरवटे, बट्टेवार, खान तसेच होमगार्ड राठोड,गिरी यांनी तामसा तांडा शिवारात अचानक छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच काही जुगारी घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र पोलिसांनी वेगाने कारवाई करत संजय तुकाराम धुमाळे (वय ४५, रा. तामसा, जि. नांदेड) याला ताब्यात घेतले. घटनास्थळाची तपासणी केली असता तेथे अवैधरीत्या जुगार खेळला जात असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून ९ मोटारसायकली तसेच रोख रक्कम असा एकूण ५ लाख ६३ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या धाडसी कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी मोठा आळा घातल्याचे बोलले जात आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी दत्तात्रय हाके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या प्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात पोलिसांचे विशेष लक्ष असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर कारवायांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस प्रशासनाने दिला आहे.तरीपण छुप्या मार्गाने चालु असलेल्या इतर अवैध धंद्यावर अशीच कारवाई करण्यात येईल का याकडे तामसवासीयांचे लक्ष लागले आहे,


## जाहीर प्रगटन

सर्व नागरीक मौ. रामेश्वर ता. धर्माबाद जि. नांदेड यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की श्री गजेद्र हनमंतराव पाटील रा. सोनारी ता भोकर यांचे नावे असलेली शेत जमीन मौ. रामेश्वर ता. धर्माबाद जि. नांदेड येथील गट क्र ०१ क्षेत्र-१.०० हे. आर ही जमीन हैद्राबाद ईनाम निर्मलून व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार झालेले हस्तांतरण कृषक प्रयोजनासाठी नियमीत करून भोगवटदार - २ चे भोगवटदार -१ मध्ये रुपांतर करणेसाठी मा. जिल्हाधिकारी नांदेड व तहसिल कार्यालय धर्माबाद येथे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे...

तरी प्रकरणात शासन परीपत्रक अन्वये हैद्राबाद ईनाम निर्मलून व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कार्यवाही करणे आहे. करीता मौ. रामेश्वर ता. धर्माबाद परीसरातील जनतेस या बाबत काही आक्षेप किंवा उजरदारी असल्यास लेखी स्वरूपात दिनांक १७/०३/२०२६ पूर्वी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या ७ दिवसात या कार्यालयात सादर करावे मुदतीनंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार धर्माबाद**

## संक्षिप्त वृत्त...

### महिला दिनानिमित्त नगरपरिषद येथे विविध कार्यक्रम

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** महिला दिनानिमित्त नगर परिषदेच्या वतीने बचत गटाच्या महिलांसाठी आरोग्य शिबीर व महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन नगराध्यक्ष परमेश्वर कदम, मुख्याधिकारी युवराज पोळ यांनी केले. यावेळी मंचावर गटनेते सद्दाम हुसेन, नगरसेवक अक्षय कदम, उपनगराध्यक्ष निलेश राठोड, नगरसेवक बळीराम काटे, सौदागर कौसर, कुरेशी समरीन, कुशावतीबाई झिरपे, मीनाक्षी अंभोरे, मारुती रंजवे, शिवकन्या घुगे, जनार्धन झिरपे, गणेश पाटील, आशिष मुंढे, प्रशांत बिराजदार आदी उपस्थित होते.

या वेळी बचत गटांच्या महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच एकल महिलांसाठी विविध योजना अंतर्गत मिळणाऱ्या लाभांची माहिती देण्यात आली. या प्रसंगी शहरातील उत्कृष्ट बचत गटांचा सत्कार करण्यात आला. बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले होते. या प्रसंगी बोलताना नगराध्यक्ष परमेश्वर कदम म्हणाले की नगरपरिषद अंतर्गत शहरातील महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून बचत गटांना ऊअध-छणङ्च योजने मार्फत दिले जाणारे कर्ज व सुविधा याचा वापर शासकीय नियमाप्रमाणे करून बचत गटांनी सक्षम होऊन आपल्या शहराचे नाव उंचवावे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी लेखाधिकारी दादासाहेब पौळ, अविनाश भिसे , किशोर मुंडे. कृष्णा माने, उदय पांडे, विद्या पिंपळवाडकर, दिलीप परळकर, पंडितराव कदम, पुनम खिल्लारे ,दिलीप जाधव, धम्मपाल किरवले. साहिल माने,बंडू गिरी, अफरोज, वैद्यकीय अधिकारी डॉ. मृदुला जबदे, डॉ सलीम शेख, स्वप्निल राठोड. सौरभ चव्हाण, वैष्णवी पांचाळ, जयमाला हजारे, अनिता फुकाने आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विद्या जोशी यांनी केले या मेळाव्यास शहरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिजाऊ ब्रिगेडच्या पाथरी तालुकाध्यक्षपदी शिवकन्या पौळ

**पाथरी,/प्रतिनिधी :** महिला सक्षमीकरण आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या पाथरी तालुकाध्यक्षपदी सौ. शिवकन्या तुकाराम पौळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

या नियुक्तीची घोषणा ॲड. वैशालीताई डोळस यांच्यावतीने करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात नूतन तालुकाध्यक्ष शिवकन्या पौळ यांना नियुक्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला कृषी भूषण कांतराव काका देशमुख (झरीकर), मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तथा वाशिम येथील शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, माजी जिल्हा परिषद सभापती मिराताई दादासाहेब टेंगसे, जिल्हाध्यक्ष कांचनताई कारेंगावकर यांच्यासह उषाताई लोहट, यादव ताई, आशाताई कदम तसेच अनेक महिला पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर बोलताना पौळ यांनी जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### विविध प्रलंबित मागण्यांसाठी मनपा कर्मचाऱ्यांद्वारे ६ एप्रिलपासून बेमुदत कामबंदचा इशारा : महापालिका आयुक्तांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या ५ एप्रिल पर्यंत पूर्ण न झाल्यास ६ एप्रिलपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

संघटनेचे अध्यक्ष नासेर खान वहीद खान, उपाध्यक्ष विनय ठाकूर, सचिव विशाल उफाडे यांच्यासह महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी संघटनेच्या सदस्यांच्या मंगळवार १० मार्च रोजी महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांना यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असे महत्त्वाचे सण काही दिवसांवर आले आहेत. या पार्श्वभूमीवर मनपा कर्मचाऱ्यांचे थकित चार महिन्यांचे वेतन ५ एप्रिलपूर्वी अदा करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. केवळ दोन महिन्यांचे वेतन दिल्यास बँक कर्जाच्या हप्त्यांमध्ये ते वळते होत असल्याने कर्मचाऱ्यांच्या हाती काहीच शिल्लक राहत नाही, त्यामुळे चार महिन्यांचे वेतन एकत्रित देणे आवश्यक असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

तसेच सन २०२४-२५ च्या वार्षिक वेतनवाढीचा फरक कर्मचाऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावा, आरोग्य विभागातील एएनएम कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनुसार वेतन निश्चिती करावी, आरसीएच एएनएम कर्मचाऱ्यांचे कंत्राटी कालावधीतील एप्रिल २०२२ चे थकीत वेतन अदा करावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय १२/२४ वर्षांच्या कालबद्ध पदोन्नतीची प्रकरणे निकाली काढावीत, सेवा निवृत्त अथवा मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशीप्रमाणे सेवेत सामावून घ्यावे, बायोमेट्रिक हजेरीमुळे कपात झालेले वेतन परत द्यावे, तसेच सातव्या वेतन आयोगानुसार २०१६ पासूनचा फरक तात्काळ अदा करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

वर्ग-३ कर्मचाऱ्यांना गणवेश व ओळखपत्र देण्यात यावे तसेच रमजान ईद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वर्ग-३ कर्मचाऱ्यांना २५ हजार रुपये आणि वर्ग-४ कर्मचाऱ्यांना १५ हजार रुपये फेस्टीवल ॲडव्हान्स देण्याची मागणीही संघटनेने केली आहे. या सर्व मागण्या ५ एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात, अन्यथा ६ एप्रिलपासून सर्व कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करतील, अशा इशाराही या निवेदनाद्वारे दिला आहे.

### पाणीपट्टी व मालमत्ता करासाठी अभय योजनेला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेमार्फत पाणीपट्टी व मालमत्ता कराची वसुली अधिक प्रभावीपणे व्हावी आणि थकीत कराची वसुली वाढावी यासाठी जाहीर करण्यात आलेल्या अभय योजनेला आता ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी १० मार्च हा या योजनेचा शेवटचा दिवस होता.

अभय योजना जाहीर झाल्यानंतर नागरिकांकडून कर भरण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळत असल्यामुळे महानगरपालिकेने या योजनेची मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्तांनी १० मार्च रोजी आदेश काढले असून त्यानुसार अभय योजनेचा लाभ आता ३१ मार्चपर्यंत घेता येणार आहे. या योजनेअंतर्गत थकीत तसेच चालू वर्षापर्यंतच्या पाणीपट्टी व मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या मालमत्ताधारकांना विलंब शुल्कात शंभर टक्के सूट मिळणार आहे. त्यामुळे मालमत्ताधारकांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी थकीत व चालू वर्षापर्यंतच्या पाणीपट्टी व मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केलेआहे.

# मानवतला दुचाकी पेटली की पेटवली

## मानवत पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद, मानवत येथील चोरी, अवैध गुन्हेगारी वाढल्याने चिंता वाढली

**मानवत ,/प्रतिनिधी-** मानवत येथील दुचाकी पेटली की पेटवली शहराच चर्चेला उधान ? मानवत पोलीस ठाण्यात गून्हा नोंद करण्यात आला आहे.

शहरातील जुने दत्त मंदिर परिसरात घरासमोर उभी केलेली दुचाकी रविवारी दिनांक ८ च्या पहाटे जळालेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. त्यामूळे शहरात दुचाकी अचानक पेटली की कोणीतरी जाणीवपूर्वक पेटवली, याबाबत संशय व्यक्त होत असून या प्रकरणी गून्हाची नोंद मानवत पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. सविस्तर माहिती अशी की मानवत शहरातील जुने दत्त मंदिर परिसरातील रहिवासी चंद्रकांत सुपेकर यांनी आपली दुचाकी (एम.एच.२२ वाय.०१५७) नेहमी प्रमाणे घरासमोर उभी केली होती. रात्री कुटुंबीय झोपेत असताना रविवारी (दि.८) पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास परिसरातील एका व्यक्तीने दुचाकी पेटविल्याची माहिती कुटुंबीयांना दिली. कुटुंबीय बाहेर येईपर्यंत दुचाकीने मोठ्या प्रमाणात पेट घेतला होता. या आगीत वाहन पूर्णपणे जळून खाक झाले असून सुमारे ३० ते ३५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले घटना सकाली उघडकीस येताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. दुचाकीमध्ये तांत्रिक बिघाडामुळे आग लागली की जाणीवपूर्वक आग लावण्यात आली, याबाबत तर्कवितर्क काढले जात आहेत. या संदर्भात पोलिसांनी जनरल डायरीमध्ये नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे. घटने मागील नेमके कारण तपासा नंतर स्पष्ट होणार आहे.



## जिल्हाधिकारी कार्यालयात महिला दिन उत्साहात साजरा

**परभणी,/प्रतिनिधी:** जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आज कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी शोभादेवी जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण काळे, वैद्यकीय अधिकारी किशोर सुरवसे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार संदीप राजापुरे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन तसेच सामाजिक, प्रशासकीय आणि आर्थिक क्षेत्रातील महिलांचे वाढते योगदान यावर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी आत्मविश्वास, जिद्द आणि कष्टाच्या बळावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून समाजाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी शोभादेवी जाधव यांनी महिलांना आयुष्यात अधिक संघर्ष करावा लागतो, मात्र तरीही त्या आपल्या कर्तृत्वाने प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहेत, असे सांगितले. स्त्री-पुरुष भेदभाव न करता मानव म्हणून एकमेकांकडे पाहिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. प्राचीन काळातील गार्गी आणि मैत्रेयी यांसारख्या विदुषींचा उल्लेख करत महिलांच्या बौद्धिक परंपरेचा गौरव त्यांनी केला.

प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी केले. त्यांनी सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजाराम मोहन रॉय आणि महात्मा ज्योतिबा फुले या समाजसुधारकांनी महिलांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी केलेल्या कार्याची आठवण करून दिली. तसेच ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्क येथे वस्त्रोद्योगातील महिला कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जागतिक महिला दिनाची परंपरा सुरू झाल्याची माहिती त्यांनी दिली.

त्या म्हणाल्या की मी, २००१ मध्ये महसूल विभागात तहसीलदार म्हणून रुजू झाले तेव्हा महिलांचे प्रमाण अत्यल्प होते. मात्र आज परभणी महसूल विभागाच्या आस्थापनेवर सात महिला उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच जिल्ह्यात दोन महिला तहसीलदार आणि दोन महिला नायब तहसीलदार कार्यरत आहेत. पंचायत समिती, महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये महिला अधिकाऱ्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. जिल्हाधिकारी यांनी दाखविलेल्या विश्वासामुळे हे शक्य झाले, असे त्यांनी नमूद केले.

### पहाटे थंडी व दुपारी उन्हामुळे नागरिक हैराण

**परभणी,/प्रतिनिधी:** सध्या जिल्हाभरात सकाळच्या सुमारास चांगलीच थंडी चांगलीच वाजून येत आहे. तर दुपारी पडणाऱ्या उन्हामुळे नागरिक या वातावरणामुळे हैराण झाले आहेत.

दरम्यान जिल्हाभरात यावर्षी पावसाळा तसेच हिवाळा चांगला झाला होता. परंतू सध्या काही दिवसापासून उन्हाचा पारा चांगलाच वाढलेला दिसून येत आहे. त्याचाच परिणाम नागरिकांच्या आरोग्याच्यावर चांगलाच परिणाम जाणवू लागला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आणखीन उन्हाचा किती परिणाम जाणवणार आहे, याचीच काळजी आता नागरिकांना लागली आहे.

### मानवत तालुक्यात आयोजित महाराजस्व समाधान शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानातंर्गत मानवत तालुक्यात १४ मार्च २०२६ रोजी कोल्हा मंडळ, १० एप्रिल रोजी ताडबोरगाव मंडळ, १७ एप्रिल रोजी रामपुरी मंडळ आणि ८ मे रोजी मानवत मंडळ येथे शिबिरं होणार आहेत.

महसूल विभागाशी संबंधित नागरिक व शेतकऱ्यांचे दैनंदिन प्रश्न तात्काळ निकाली काढणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील नव्या तरतुदींची जनजागृती करणे, डिजिटल सेवांचा वापर वाढविणे तसेच 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी'द्वारे नागरिकांना सेवा देणे, विविध प्रमाणपत्रांचे वितरण हा या अभियानाचा उद्देश आहे. या शिबिरांमध्ये ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित तक्रारी व प्रश्नांचे निराकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे मानवत तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसिलदार, मानवत यांनी केले आहे.

### परभणी जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीसाठी १८ मार्च रोजी विशेष सभा

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांच्या निवडीसाठी बुधवार, दि. १८ मार्च २०२६ रोजी विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा दुपारी २ वाजता जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये होणार आहे.पिठासीन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडणार आहे. इच्छुक उमेदवारांकडून नामनिर्देशन पत्रे सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारली जाणार आहेत. सर्व नवनिर्वाचित सदस्यांनी यासाठी उपस्थित रहावे.

## राष्ट्रीय लोकअदालतीचे १४ मार्चला आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्यामार्फत परभणी व हिंगोली जिल्हयामध्ये संबंधीत न्यायालय परिसरात करण्यात येणार आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये न्यायालयातील सर्व प्रकारची तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, भारतीय चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ चेक बॉउन्स, बँक वसूली प्रकरणे, मोटार अपघातांची प्रकरणे, कौटुंबिक वादाची प्रकरणे, भू-संपादन प्रकरणे, विज (चोरीची प्रकरणे वगळून) व पाणी आकार प्रकरणे आणि दिवाणी स्वरूपांची इतर प्रकरणे तसेच बँकेची वसुली वाद पूर्व दाखल प्रकरणे ठेवण्यात येणार असून तडजोडी अंती जास्तीत जास्त प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीकोणातून न्यायाधीश व वकील यांचे पॅनल आपल्याला मदत करतील आणि यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

ज्या न्यायालयात आपली प्रकरणे/ केस आहे तेथे अर्ज करावा आणि सोबतच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समिती येथे १४ मार्च पुर्वी अर्ज करुन माहिती देणे गरजेचे आहे. लोक अदालतचे फायदे लोकन्यायालयात निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट-फी ची रक्कम परत मिळते, प्रकरण/ केसचा निपटारा त्याच दिवशी होत असल्याने आपला वेळ व पैसे याची बचत होते. दोन्ही पक्षकार मा. न्यायाधीश यांच्या समक्ष चर्चा करुन प्रकरण / केसचा निपटारा करु शकतात. त्यामुळे कटूताही निर्माण होत नाही.

आयोजित राष्ट्रीय लोकन्यायालयातन्यायालयातील प्रलंबित तडजोड पात्र प्रकरणे जास्त जास्त ठेवुन तडजोडीअंती निकाली काढण्याचे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश, उज्वला म. नंदेश्वर यांनी केले आहे.

## महिला दिनानिमित्त आयोजित अस्मिता लीग धावण्याच्या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी:** जागतिक महिला दिनानिमित्त मुली व महिलांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने मेरा युवा भारत परभणी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खेलो इंडिया अस्मिता लीग धावणे स्पर्धा ८ मार्च रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे उत्साहात संपन्न झाली.



स्पर्धेसाठी १३ वर्षाखालील मुली, १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुली तसेच १८ वर्षांवरील मुली व महिला असे तीन वयोगट निश्चित करण्यात आले होते. या स्पर्धेत १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. तिन्ही वयोगटातील मुली व महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा अधिकारी कल्याण पोळे, सुयश नाटकर, जिल्हा क्रीडा संघटनेचे सचिव कैलास माने, राज्य ॲथलेटिक्स असोसिएशनचे प्रतिनिधी रणजीत काकडे तसेच मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी शशांक राहुला, दिपाली मुद्गलकर, सुषमा कुमावत, सारिका टेकाळे, शारदा पांचाळ व ज्योती गाडे उपस्थित होत्या. स्पर्धेतील प्रत्येक वयोगटातील पहिल्या तीन क्रमांकाच्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



**जिंतुर- पंचायत समिती ऊप सभापती सोनाली ताई माधवराव दराडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा भव्य दिव्य सत्कार करण्यात आला यावेळी परभणी जिल्ह्याचे कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांचे बंधु शिवाजीराव कदम बोर्डीकर व रोकडे मामा यांनी त्यांचा सत्कार करण्यात आला.**

## सुशिक्षित बेरोजगारांसाठी सेलू येथे १३ मार्च, आणि पाथरी येथे १७ मार्चला रोजगार मेळावा

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यावतीने दि. १३ मार्च, २०२६ रोजी सकाळी १० वाजता सेलू येथील श्री साईबाबा मंदिर, महेश नगर येथे आणि दि. १७ मार्च, २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांताबाई नखाते विद्यालय, शिवाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने पाथरी येथील शांताबाई नखाते विद्यालय येथे "पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा" आयोजीत करण्यात आला आहे.

या मेळाव्यास राज्यातील विविध नामांकित मोठे उद्योजक /कंपन्या सहभाग नोंदविणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय, डीप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांची ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, क्षेत्र अधिकारी, विमा सखी, इत्यादी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी वेतन १० ते २५ हजार असणार आहे. तद्नंतर अनुभवावरुन वेतनामध्ये वाढ होऊ शकते तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत शासकीय/निमशासकीय/ खाजगी कार्यालयामध्ये प्रशिक्षण व आर्थिक लाभासह अनुभव प्रमाणपत्र देखील मिळते. महारोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी महाराष्ट्र शासनाच्या (..) या वेबसाईटवर करावी. नाव नोंदणीची सुविधा महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी देखील करण्यात आलेली आहे. महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नाव नोंदणी करण्यासाठी दि. १३ मार्च, रोजी सकाळी १० वाजता श्री साईबाबा मंदिर, महेश नगर, सेलू येथे व दि. १७ मार्च रोजी शांताबाई नखाते विद्यालय, शिवाजी नगर पाथरी येथे स्वखर्चाने उमेदवारांनी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील जास्तीतजास्त बेरोजगार उमेदवारांनी सहभाग नोंदवावा, तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त प्र.सो. खंदारे यांनी केले आहे.